

चेन्नई ते मुंबई , गड किल्ल्यांचा प्रवास...
लेखन- सचिन काकडे
स्वराज्याची
दख्खन
दौलत

| | | |
|---|---|---|
| ई - पुस्तक | : | स्वराज्याची दख्खन दौलत |
| लेखन - संपादन | : | सचिन काकडे, मुंबई. |
| संपर्क | : | ९५९४५६६६७६. |
| ई – मेल | : | sachinkakade@lastbench.co.in |
| प्रकाशन | : | ई साहित्य प्रतिष्ठान |
| कॅलिग्राफ़ी | : | अमृता ढगे, नाशिक |
| ट्रेक ग्रुप | : | साधे सुधे ट्रेकर्स |
| छायाचित्रे | : | विक्रांत गायकवाड, सुधीर उतेकर. |
| विशेष सहाय्य | : | सुरज सकपाळ, पनवेल. |

www.esahity.com
esahity@gmail.com
eleventh floor, eternity
eastern express highway
thane, 400604.

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे .

® esahity pratishthan ©2017

# ☙ प्रस्तावक अर्पण ❧

अघोर साल्हेराच्या जटांपासून ... सहयाद्रीच्या कटेवरून ...कावेरीच्या तटांपर्यंतच्या मातीवर कोरल्या अभिमानी, अस्मानी इतिहासाचं वेड उरात आणि भगवा करात घेऊन ... गाठीला जिद्द आणि पाठीला हद्द ठेवित.... आभाळाच्या उत्तुंगतेचा दिमाख मिरविता... स्वराज्याच्या "दख्खन दौलती" चा ०३ राज्य, ०७ बाईक, ०८ दिवस , ०९ रात्र, १४ मित्रांचा आणि १८ किल्ल्यांचा आभाळाच्या वाटांचा हा प्रवास...

स्वतंत्र राज्याचे स्वप्न उराशी बांधून दक्षिणी राज्यांची एकसंघ मूठ बांधणारे स्वराज्यसंकल्पक फर्जंद शहाजी महाराज हिच मूठ घट्ट बांधून तिची वज्रमूठ करून स्वराज्याच्या सीमा रुंदावणारे छत्रपती महाराज शिवराय स्वतंत्र मराठा साम्राज्य, प्राणापालिकडे झुंजत ठेवणारे छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्याच्या आणीबाणीच्या काळात दूर जिंजी किल्ल्यावर राहून मुत्सद्दी राजकारण करणारे छत्रपती राजाराम महाराज, महाराष्ट्र ते कर्नाटक जिंजी प्रदेशाचं रणमैदान करून शत्रूला जेरीस आणणारे सेनापती संताजी घोरपडे, सेनापती धनाजी जाधव आणि स्वराज्यावर संकट आले असताना दक्षिण स्वराज्याचे रक्षण करणारे आणि सीमा रुंदावणारे सरसुभेदार हरजीराजे महाडिक

तसेच स्वराज्यासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेऊन दक्षिणेत मर्दांनी समशेर गाजवणा-या प्रत्येक रणधुरंदर मराठी मावळ्यांना **अर्पण....!!**

# छत्रपती शिवाजी महाराजांचा दक्षिण दिग्विजय...

६ जून १६७४ रोजी छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा किल्ले रायगडावर थाटामाटात पार पडल्यावर स्वराज्याला बळकटी आली.. याने खवळल्या मुघली त्यात महत्वेकरुन दक्षिणेतील पातशाही सत्तांनी स्वराज्यावरील आक्रमण वाढविले... त्याचा बंदोबस्त आणि स्वराज्य वृध्दिगंत करण्यासाठी महाराजांनी ... कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू हा त्याकाळचा 'कर्नाटक' म्हणुन संबोधल्या जाणा-या दक्षिण भारत प्रदेशात दिग्विजयी मोहीम काढली... "ऐशियात दक्षिणचे पातशाहित पठाण जाला हि गोष्ट बरी नव्हे: पठाण बळावला म्हणजे एक उपरि एक कुली दक्षिणियांची घरे बुडविला कोणास तगो देणार नाही:..पठाणांची नेस्तनाबुत करणे, दक्षिणची पादशाही आम्हा दक्षिणियांच्या हाती राहे हे करावे" म्हणत....



रायगडाचे आणि स्वराज्याचे मुख्य कारभार विश्वासू अष्टप्रधान मंडळाकडे सोपवून महाराज शिवराय ६ ऑक्टोबर १६७६ या दसऱ्याच्या मुहूर्तावर २५००० घोडदळ आणि ४०००० पायदळानीशी रायगडावरून दक्षिण दिग्विजयास बाहेर पडले.. कोकणातून अंबोलीचा घाट पार करुन देशावर येताच सैन्याचे दोन भाग करीत आदिलशाहीचा काही मुलुख काबीज करण्याची जबाबदारी सेनापती हंबीररावांकडे सोपवुन स्वत: भागानगर (कुतुबशाही) प्रांताकडे रवाना झाले... कुतुबशाहीने महाराजांशी तह करीत या कर्नाटक मोहीमेचा खर्च उचलला तसेच मोहिमेसाठी कूतुबशाहीचा आधुनिक तोफखाना, ४००० पायदळ आणि १००० घोडदळ महाराजांसोबत दिले... इथुन महाराजांनी महत्वाचे प्रांत काबीज करण्यास सुरुवात केली... किल्ले जिंजी जिंकून घेतला.. जुने बांधकाम पाडून, जिंजी नव्याने उभा केला.. वेल्लोर ला वेढा देऊन होणा-या चिवट प्रतिकारावर मारा म्हणून वेल्लोर किल्ल्यासमोर साजरा गोजरा नावाचे दोन जुळे किल्ले बांधून वेल्लोर वर आक्रमण वाढविले ...आदिलशाहीला सुरुंग लावीत तिरुवाडी जिंकून घेतला माघारी फिरत...कावेरीपट्टम, चिदंबरम, वृद्धाचलम तसेच शहाजीराज्यांच्या जुन्या जहागिरीचा प्रदेश बाळापुर, बंगरूळ, शिरें, होसकोट जिंकून घेतला. अर्णीला वेढा घालून अर्णी जिंकली त्यासोबतच चिकबाळापूर, दोडडबाळापूर, देवरायानदुर्ग, तुमकुर, चित्रदुर्ग, कल्याणदुर्ग, रायदुर्ग, हंपी, कनकगिरी, कोप्पळ, लक्ष्मेश्वर, गदग हा भाग जिंकून घेत तब्बल दीड वर्ष चाललेल्या कर्नाटक मोहिमेची यशस्वी सांगता करीत, स्वराज्याच्या दुपटीहून जास्त मुलुख मिळवून मोघल, सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज, कुतुबशाही, आदिलशाहीचा चोख बंदोबस्त करून... महाराज मार्च १६७८ साली स्वराज्यातल्या पन्हाळ्यावर परतले..

या मोहिमेचे फलस्वरूप साल्हेरपासून जिंजीपर्यंत स्वराज्यातल्या किल्ल्यांची एकसलग रांग उभी झाली... जिच्यामुळे महाराजांच्या मृत्यनंतर आणि संभाजी राजांची निर्घुण हत्येनंतरही मराठ्यांना गनीमांविरुद्ध स्वराज्य लढविता आणि औरंगजेबास जेरीस आणता आले.. महाराजांची दूरदृष्टीने राजाराम महाराजांना रायगड सोडावा लागल्यानंतर जिंजी आश्रय झाला.. जिंजी स्वराज्याची तिसरी राजधानी म्हणून नावारूपाला आली... या दक्षिण दिग्विजयाचे महत्व विविधांगी राजकारणाचे प्रतीक आहे. मोहिमेत जास्त जाळपोळ आणि लूटमार झाली नाही. त्यामुळे स्थानिक जनतेत मराठ्यांविषयी संकट भासले नाही. शौर्य, धैर्य, हीच दिग्विजयाची मुख्य अंगे आहेत. आपल्या शौर्य, धैर्याची शेखी मिरविणाऱ्या इंग्रजांनी शिवाजी महाराजांच्या दक्षिण कर्नाटकातील राजकीय कारवाईची उत्कृष्ट आणि असामान्य अशी नोंद केली आहे. आणि हि नोंद त्या मोहिमेच्या वास्तवतेची जाणीव करून देते.

जय शिवराय ...!!

# गणपती बाप्पा मोरया ...

भटक्यांच्या धुळवडीचा “कोकण दुर्ग” सफ़रीचा उधळला रंगधुरळा गाड्या आणि गड्यांच्या मनावरुन पुसट होण्याआधीच ठरलेली “दक्षिण स्वारी” महाराज शिवरायांनी राज्याभिषेकानंतर आखलेली “दक्षिण दिग्विजय” मोहिम आणि , "दक्षिणची पातशाही आम्हा दक्षिणीयांच्या हाती"...या शिवगर्जनेने स्वराज्य श्रीमंत केली गड दुर्ग किल्ल्यांची “दख्खन दौलत” स्वराज्याची तिसरी राजधानी चंदी म्हणजेच “किल्ले जिंजी” भटक्यांनी पुढल्या स्वारीत अदब 'मुजरा' करावी असा धुळवडीच्या पुढल्या तीन महिन्यातच संमत झालेला ठराव...

कॅलेंडरच्या तारखांना स्वराज्याच्या या दख्खन वाटा खुणावत्या झाल्या... आबा, सुरज, विलासदा यांनी दोन बैठकीतच तरबेज तल्लख आणि तितक्याच नेमक्या आखणीत इतिहास अधिक भुगोल तपासुन... ठरलेल्या १४ जानेवारी ते २२ जानेवारी या तारखांत “तामिळनाडु- कर्नाटक- महाराष्ट्र” असा तीन राज्यातल्या १६ किल्ल्यांपर्यंतचा.. आभाळाच्या वाटांनी म्हणजेच विमानाने चेन्नई तिथुन बाईकने मुंबई असा आखलेला २००० किमी प्रवास..




दिड महिना आधी ठरलेले १४... त्यातले तिकिट बुक केले १३.... विक्रांत बोटीवरून परत आल्याने त्याच्यासकट मी असे २ नवे बुकिंग असे १५ ....मग त्यातुन रुपेश वजा झाल्याने.... अखेर विमानाने चेन्नई पर्यंत पोहोचण्यास उत्सुक फ़ायनल १४ भटके...

ट्रान्सपोर्ट मार्गे चेन्नई पोहोचल्या ७ दिवस आधी पाठवल्या ८ ... परत पाठवली वजा १ अशा ७ गाड्या... ग्रुपवर ७ कृष्ण आणि ७ अर्जुनांची... ९ दिवस ९ रात्र अशा मोठ्या ट्रिपच्या तजवीजीला लागणा-या वस्तु , नकाशे, माहितीची देवाणघेवाण... ऐन १४ चा दिवस उजाडेतो सगळ्यांचीच चाललेली शॉपिंग... मुंबईच्या वेगवेगळ्या कोप-यातुन प्रत्येकाने नेमकी गाठलेली विमानतळावर भेटण्याची संध्याकाळी ७ ची वेळ...

पहिल्याच विमान प्रवासाची विक्रांत आणि विलासदा वगळता सगळ्यांच्या चेह-यावरची उत्सुकता... आवर्जुन निरोपाला आलेले विशाल पेडणेकर, संदीप वाडकर, संदीप मोरे सोबत विमानतळावरच्या गेटवर एक फ़ोटोसेशन... ७.३० ला गेट एन्ट्री .. रात्री ८.०० पर्यंत मिळालेले बोर्डिंग पासेस... ते देत असताना एकत्रच १४ जण आणि त्यांच्या ३२ बॅगा याने विमान कंपनीच्या कर्मचा-यांची उडालेली तारांबळ तेवढ्या वेळात या अतरंगी “बाईक राईड” ची त्यांनी घेतलेली माहिती... आधी अवाक होत आणि मग बोर्डींग पास सोपवताना केलेलं स्मितहास्य “हॅप्पी जर्नी” कौतुक...




काळजीचा निरोप

पोहोचलो तर सोबत पोहोचु.. चुकलो तर सोबत चुकु... हरवले तर सोबत हरवु... या दोस्तीतल्या आधारव्याखेने कुठल्या कुठे हरवलेली पहिलाच विमानप्रवास असल्याची जाणीव भिती वगैरे त्याची निवांत गप्पा मस्ती सराईत मोकळ्या वातावरणाने घेतलेली जागा..



बॅगेज काऊंटरच्या सरकत्या पट्ट्यावरुन आपापल्या बॅगांना सरकता निरोप दिल्यावर... संक्रातीच्या दिवसाचे तिळाचे प्रत्येकी दोन दोन लाडू उडवित राहिलेल्या सिक्युरिटी चेक ईनसाठी दोन-दोनदा देहावरला लवाजमा उतरवुन मग तो पुन्हा चढवुन Indigo Flight 6E-459 Mumbai To Chennai अशी पाटी असलेल्या गेटवर... पुन्हा बोर्डिंग पास वेरीफ़िकेशन ही दिव्य पार पडल्यावर आधी विमानापर्यंत नेणारी बस... मग थेट ९.०० च्या सुमाराला फ़्लाईटमध्ये १२ मागची आणि मागाहुन दफ़्तरी कोट्यातुन बुक केल्याने वेगळी झालेली माझी आणि विक्याची २ पुढची.... अशी आपापली खिडकीजवळच्या तिकिटाची जागा हेरुन "कधी उडणार बे आपण?" अशी एकमेकांना खुणवाखुणवी... खिडकीतुन दिसत असल्या विमानतळवरच्या दिव्यांच्या रांगोळ्या.... त्या मधल्या रांगेत काही उभी , काही सरकती, काही उडती , काही उतरती विमानं... मधुनच कानावर पडणारे विमानतल्या एयरहोस्टेस, कॅप्टन चे मेसेज वजा सुचना आणि एकदाचं काय ते "खुर्सी की पेटी बांधिये अपना फ़ोन फ़्लाईट मोड पर रखे अब हम चेन्नई के लिए उडान भर रहे है" म्हणत रन वे पर्यंत टॅक्सींग होतांना दिव्य दिव्यांची दिवाळी आणि "जिवाची मुंबई" दाखवत ९.३० च्या ठोक्याला विमानाने घेतलेलं धाकधुक उड्डाण...



जमिनीपासुन ३५००० फ़ुटांवर विमान स्थिरावल्याची सुचना झाल्यावर सराईत प्रवाशांनी आणि त्यांचं पाहुन आम्ही कमरेचे मोकळे केलेले पट्टे ... अर्धा तास दोस्तांशिवाय पुढं काढून झाल्यावर त्यांच्या आठवणीने आणि मागे काही जागा असल्याने मी आणि विक्रांतने इतर प्रवाशांसोबत बदललेल्या जागा.. मग टेक ऑफ़ च्या झटक्याचे प्रत्येकाचे अनुभव कथन... एसटीच्याच मागच्या सिटाला शोभावा असा "जब दोस्त ही दुनिया है तो दुनिया कि क्या फ़िकर" असा आमच्या १४ जणांना पुर्णप्रवास धिंगाणा... दफ़्तरी कोट्यातल्या २ तिकिटावर मिळालेल्या मील कुपनावर आलेलं एक कप नुडल्स, एक सॅंडविच आणि दोन ज्युस... पुराणात एक तीळ ७ जणात तर १४ जणांत मग आता "एवढं" तर ज्यादाच है म्हणत सगळ्यांनी मिळुन केलेला हवाई अल्पोपहार...

मधल्या वेळात चहा कॉफ़ी सुप सॅंडविच विकायला आलेल्या एयरहोस्टेस कडे शंकर बापुंनी आपल्या भाषेत त्यांच्या कडे "चहा मिळेल का ?" विचारण्याचा केलेला निष्फ़ळ प्रयत्न .... एयरहोस्टेस पाण्याचे कप स्वत: (फ़ुकट) आणुन

देते म्हणल्यावर पुढे लॅडींग होईतो इतर पोरांना सारख्या लागणा-या तहाना... तासाभरातच १०.३० ला चेन्नईत पोहोचल्याची कॅप्टन ची सुचना पुन्हा खुर्सी की पेटी...मग तिथुन पुढे दहाव्या मिनिटालां झालेलं पोटात गोळा लॅंडीग.. मग टॅक्सींग , पार्किंग.. पुन्हा बस.... पहिला विमानप्रवास म्हणुन आठवणीला विमानाच्या कॅप्टन सोबत घेतला सेल्फ़ी... पोंगल सणानिमित्त सजलेलं चेन्नई विमानतळ पुन्हा सरकते पट्टे.... आपापल्या बॅगा...... विक्याने चेन्नई पोहोचलो या खुशाली ला टाकलेलं फ़ेसबुक लाईव्ह ...

गुंडाच्या ऑफ़िसचं चेन्नई एयरपोर्टवरच काम सुरु असल्याने त्यांच्या तिथल्या ऑफ़िसातल्या मित्रांनी एयरपोर्टवरच पार्क केलेल्या ८ गाड्या... गाड्यांची तपासणी.... ट्रान्सपोर्टवाल्यांच्या कृपेने ३ गाड्यांचे ब-यापैकी नुकसान.... दोन दोन शिव्या देउन झाल्यावर गाड्यांच्या चाव्या आणि हेल्मेटसचा घेतलेला ताबा. रुपेशची ८ वी गाडी माघारी पाठविण्यासाठी तिथेच ठेवुन पुढे पंधरा मिनिटावर मुक्कामी हॉटेलासाठी बाईकला दिले सेल्फ़ .. ११.३० ला हॉटेलवर प्रत्येकजण बॅगा सह देह टाकुन..... जेवणाची सोय करायला गेलेल्या आबा परत येईतो एकेक जण फ्रेश होत... मग १२.०० ला एकत्र जेवण आणि उद्याच्या पहिल्या दिवासाच्या प्रवासाची एकवार उजळणी, थोड्याफ़ार गप्पा – मस्ती करत ड्रिम राईड साठी किर्र रात्री ड्रिमात गेलेले सगळे....

## 1 दिवस पहिला

पहाटे ५.०० ला सगळ्यांनी लावलेल्या अलार्मने आणलेली जाग... एरव्ही एकाच्या तयारीला लागणा-या तासाच्या हिशोबातच... १४ च्या १४ जणांनी उरकलेल्या तया-या... सकाळी ६.०० च्या चहानंतर गाडीला बॅगा बांधुन, हेल्मेट , ग्लोव्हस, रायडिंग गियर्स सकट आपापल्या अर्जुनासह चेन्नई ते जिंजी य़ा १६७ किलोमीटर च्या टप्प्यासाठी सिध्द झाले सगळे कृष्ण...



चेन्नई – चेंगलीपट्ट – मेलामारुणाठूर – तिंडीवानम हायवेचा १४२ किलोमीटरचा सनाट रस्ता २ तासांत काबीज केल्यावर उजव्या वळणाकरीता घेतलेला हॉल्ट.... तिथल्या वळणावर उभ्या म्हातारीच्या आर्जवाने घेतले गजरे गाड्यांना बांधुन ...अर्ध्या तासाच्या विश्रांती नंतर अवघ्या २५ किलोमीटर वर उरलेल्या मराठा साम्राज्याच्या दक्षिण राजगादी , स्वराज्य राजधानी किल्ले जिंजी कडे प्रयाण...


९.०० ला गाठलेलं गजबजाट जिंजी शहर... तिथला गांधीबाजार... अगदीच नवख्या गाव शहरात आल्याची जाणीव.. किल्ल्याजवळ पोहोचल्यावर तिथं नाष्ट्याची सोय नसल्याने

पुन्हा तेवढयासाठी मागे फ़िरुन गावात जाण्याचा ठराव... भाषेच्या अडचणीने नाष्ट्याची अवघड होत चाललेली सोय... त्यामुळे झालेल्या पांगापागी ने मिळेल त्या हॉटेलात मिळेल तसा ग्रुप ग्रुप ने वडा सांबार, इडली चटणी, लेमन राईस नाष्टा उरकुन आणि सात किल्ल्यांच्या समूह असलेल्या जिंजीच्या, पहिल्या "राजगीरी" च्या पायथ्याशी जमा होत ... तिथल्या टपरी वजा दुकान असलेल्या दुकानदाराशी त्याला येत असलेल्या तोडक्या मोडक्या इंग्रजी भाषेत बॅगा ठेवण्याची विनवणी... त्याने पाठवलेल्या मुलासोबत दुकानाच्या मागेच असलेल्या गोडाऊन वजा खोलीत सगळ्या बॅगा कुलुप बंद केल्यावर ... महत्वाच्या वस्तु, क्यामेरे.. पाण्याच्या बाटल्या घेऊन जिंजीचा पहिला किल्ला 'किल्ले राजगीरी' च्या पाहणीसाठी लागणारे प्रत्येकी १५ रुपयाचे भारतीय पुरातत्व व स्वच्छ भारत चे एन्ट्री पासेस घेउन किल्ल्यात प्रवेश.

## किल्ले जिंजी

छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजयाच्या वेळी आदिलशाहीचा किल्लेदार नासीर मुहम्मद कडुन जिंकून घेतलेला .. चिंजी, चंगी, चंदी, चिंदी, जिंजी, सेंजी, गॅजिं, तांजी अशा अनेक नावांनी ओळखला जाणारा... १६८९ मध्ये मुघलांनी रायगडाला वेढा दिल्यावर छत्रपती राजाराम महाराजांना आश्रय झालेला..पुढील काळात मराठी साम्राज्याची तिसरी राजधानी.. स्वराज्याचं दख्खन तख्त .. ७ फेब्रुवारी १६९८ रोजी मराठ्यांच्या ताब्यातुन मुघलांकडे जाण्याआधी विजयनगर, नायक, मराठा व तेथुन पुढे नवाब, फ्रेंच व इंग्रज अशा हुकुमतीत राहिलेला...


भुगोलात तामिळनाडू शासनाच्या मुत्तकुडू राखीव वनक्षेत्रातल्या ९ किलोमीटर परीघातला दुर्ग समुह किल्ले जिंजी इतिहासप्रसिद्ध दुर्गम किल्ला...निसर्गाने एकावर एक शेकडो टनाचे मोठे दगड रचुन उभ्या केल्या तीन टेकड्यांवर बांधलेले समुहातले राजगिरी, कृष्णगिरी व चंद्ररायदुर्ग ज्यांचे शिवरायांनी दिग्विजयानंतर शारंगगड, गर्वगड आणि मदोन्मत्तगड असे केलेलं नामकरण.. यांना जोडुन बाहेरुन दगडाच्या तटांची आणि आतुन विटांची तटबंदी किल्ल्यात इतर पाहण्यासारखी..वेणुगोपाल, वेंकटरमणा, पट्टाभिरामा मंदिरे, सादत-उल्लाह-खान मशीद




# राजगीरी (राजाचा किल्ला)


जिंजी दुर्ग समूहातील बाराव्या शतकात राजा आनंदा कोण यांनी बांधलेला १८३ मीटर उंच दगडी तटांच्या भक्कम व बेलाग तिहेरी तटबंदीचा "राजगिरी" ...

बाले किल्ला, त्याचे दरवाजे पुढे कल्याणमहाल, धान्याची कोठारे, हत्ती खाना , तलाव, स्नानाचे चौरंग, तोफा, कैद्यांची विहीर , रंगनाथ देवालय, टेहळणी बुरुज अशा भव्यतेचा राजाचा किल्ला...किल्ले राजगीरी




















विथ गुंड बुवा

राजगीरी वर भेटलेला पुण्यातला ट्रेकर





आणि किल्ले राजगीरी सर जाहला



बच्चा कंपनीको हॅप्पी पोंगल


अडीच ते तीन एवढ्या वेळात एकेक करीत किल्ले राजगीरी उतरते झालेले सगळे ट्रेकर्स .... मग तिथे न थांबता पुन्हा गाड्यांना सेल्फ़ देत ५ मिनिटावर लगेचच गाठलेला राणीचा किल्ला 'किल्ले कृष्णगीरी' ... मग तो पाहण्यासाठी पुन्हा वेगळे त्याच किमतीचे एन्ट्री पास काढुन झाल्यावर... ररररखत्या गर्मीला मात देत्या अंगातल्या उर्मी ने अर्ध्या तासातच सर केलेला कृष्णगीरी...

# कृष्णागिरी (राणीचा किल्ला)

१२४० मध्ये कृष्ण कोण राजाच्या राजवटीत बांधला गेलेला, जिंजी दुर्ग समुहातील मध्यम उंचीचा दुसरा किल्ला किल्ले कृष्णगीरी... किल्ल्यात दगडी महाल,  वॉच टॉवर, वाडे, तटबंदी आणि कृष्णगीरीवर राज्य केलेल्या प्रत्येक राज्यकर्त्यां राजवटीच्या खुणा दिसतील अशा प्रकारची बांधकामे....











दिडएक तासाच्या कृष्णगीरी भ्रमंतीनंतर त्याच्या समोरच असलेल्या तिस-या किल्ल्याकडे किल्ले जिंजीच्या भुईकोटाकडे कूच...

# जिंजीचा भुईकोट

भुईकोटात मराठ्यांनी बांधलेलं महादेवाचं मंदीर... कृष्णगीरी व चंद्ररायदुर्ग ला जोडणारी तटबंदी... वर तटावर चौकी पहा-यांचे दगडी बांधकाम.. वगळता किल्ल्यावर वाड्यांचे अवशेष.








संध्याकाळी सहाला भुईकोट पाहुन थकल्या देहाने पुन्हा राजगीरीजवळच्या बॅगा ठेवलेल्या मळभ दाटल्या आभाळातुन टिपुस थेंब पडल्या दुकानाच्या सिमेंटच्या ओसरीवर घोटभर पाणी आणि त्यानंतर बॅगा घेऊन... तिथलं प्रसिध्द वेकंटरामाणा मंदिर.. किल्ल्याचे वेल्लोर आणि पौंडेचेरी गेट हे दोन दरवाजे .... चंद्ररायदुर्ग व कोरांगदुर्ग हे दोन किल्ले असा दुस-या दिवसाचा मोठा खजिना आणि मराठा साम्राज्याचा दागिना आखणीत असल्याने मुक्कामासाठी गाठलेलं जिंजी शहर... तिथल्या हॉटेलात १४ जणांसाठी ३ वेगवेगळ्या खोल्यांत करुन ठेवलेल्या व्यवस्थेत उरकलेल्या स्नानसंध्या ... दिवसभराची उजळणी वृत्तांत...मग जेवण येईतो जुन्या ट्रेकच्या गंमती .. आठवणी... गप्पा ... चेष्टा .. मस्करी.. गाणी... यात नेमकं गुजराती गाणं वाजल्याने... गुजरात ची सासुरवाडी असलेल्या संक्याला पोरांचा गुजराती गाण्यावर नाचण्याचा झालेला हुकुम ... मग जियो इंटनेट च्या नावानं चांगभलं म्हणत युट्युब वरील मिळेल त्या गुजराती गाण्यावर “भाय भाय” या एकाच चालीवर नाचलेला संक्या..मग सोबतील आणलेल्या ब्लुटुथ स्पीकर वर दिवसभरच्या

गडभ्रमंतीत निबार थकले असुनही.... सगळ्यांनीच दंगा करुन पंधरा दिवसावरच लग्न असलेल्या बापू च्या वरातीची चांगली दिड एक तास केलेली रंगीत तालीम अधिक राडा.... मग एका ताटात दोघं असं एकत्र जेवण... त्यानंतर जड देहाने कोण ? कधी ? कुठे झोपलं ? लक्षात यायला उजाडावी लागलेली सकाळ....

## २ दिवस दुसरा

दैंनदिनी ठरलेल्या ५.०० च्या वेळेला अजिबात हुलकावणी न देता ६.३० पर्यंत तयार झालेली सगळी पोरं ... दुसरा दिवस संध्याकाळपर्यंतचे बुकिंग असल्याने बॅगा हॉटेलवरच ठेवुन ... नुसत्या गाड्य़ांसह ७.०० पर्यंत उरकलेला चहा-बन मस्का... आणि पुन्हा किल्ले जिंजीकडे मोर्चा... वेल्लोर गेट समोरील महादेवाच्या मंदिराचं घेतलेलं अर्धा तास दर्शन तिथल्या दगडी सभामंडपाच्या कारागीरीचं निरिक्षण ... कौतुक...



महादेव मंदिर







तिथुन आधी थेट गाठलेला पॉंडेचेरी गेट..

# पाँडेचेरी गेट









पाँडेचेरी गेट पाहुन झाल्यावर वेंकटरामना मंदिरासमोरच्या पुष्करणीतुन (न) निघणा-या दगडांच्या वाटेने शंकर बापु, संक्या, मी तर पुष्करणीजवळुन निघणा-या तटबंदीच्या वाटेने तितक्याच वेळात इतरांनी गाठलेला चंद्ररायदुर्ग चा गडमाथा....

# चंद्रायदुर्ग

चंद्ररायवरुन संपुर्ण आकृती दिसणारं वेंकटरामणा मंदिर.. पोंगल सणानिमित्त भरलेली जत्रा.. माणसं गाड्यांची गर्दी.. समोरचे राजागीरी, कृष्णगीरी...




दुबईतुन अनिकेत वाघ ने तर बॅंगलोर मधुन अमर साळुंखे या वाटाड्यांनी फ़ोनवर किल्ल्याच्या भुगोलासंदर्भात दिलेल्या




माहितीच्या आधारे चंद्रराय वर असलेल्या दगडी छताच्या खोदीव बांधणीच्या पाण्याचा टाक्याचा लागलेला शोध .... घोट घोट पाणी...




सुधीर ने या मोहिमेसाठी खास म्हणुन घेतलेल्या गो प्रो क्यामेरा ची पाण्यात उरतवरुन ट्रायल.. पाण्यात काढलेला व्हिडीयो... तो वर येईपर्यंत सुधीर ची होणारी धाकधुक... प्रखर उन्हात तटबंदीने एक फ़ेरफ़टका मारुन पुर्ण गड पाहुन झाल्यावर.... त्या पावन दिनी असलेल्या स्वराज्याचे दुसरे छत्रपती. छ. संभाजीराजे महाराजांच्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून सोबत आणलेल्या छ. शिवाजी महाराज. छ. संभाजी महाराज.. तसेच दक्षिण भारतात छत्रपती शिवाजीराजेंच्या स्वराज्य विस्तारात मोलाचा वाटा उचलणा-या हरजीराजे महाडीक यांच्या प्रतिमांचे पुजन करत... महापुरुषांच्या अफाट कर्तृत्वाला दिलेली मानवंदना... सह विक्याने दिली गगनभेदी दर्जा गारद.... आणि अन साखर वाटुन साजरा केलेला आनंद...



तासाभराच्या गड फ़ेरी, राज्याभिषेक आणि विश्रांतीच्या कार्यक्रमानंतर तटबंदीनेच पल्याड असल्या कोरांगदुर्ग साठी धरलेला रस्ता...



# कोरांगदुर्ग


चंद्ररायचा जोड किल्ला वाटेतले दगडी फ्रेंच बांधणीचे बार्टीझन्स टेहळणी बुरुज.. समोरुन मन वेधुन घेणारा राजगीरी ... तटबंदीला समांतर काटेरी झुडुपाच्या पायवाटेने दक्षिणेच्या टोकावर गाठलेला कातळी दरवाजा... त्यात उतरण्यासाठी खडकात कोरलेल्या पाय-या ... मुख्य दरवाजा मारुतीचे शिल्प.. दरवाजकडे उतरणा-या पाय-या तलाव





मग आल्या वाटेनेच पुन्हा माघारी फ़िरत पुन्हा चंद्रराय ...





पुष्करणीला वळसा घालुन ... पाऊण तासात गाठलेला वेकंटरामणा मंदिराचा गाभारा...

# वेंकटरामणा मंदिर









मनोभावे दर्शन.... तिथल्या दगडी सभामंडपाच्या सावलीतुन देहभर फ़िरणा-या गार वा-याच्या झुळुकीत आणि मंत्रोच्चारांच्या गजरात प्रसाद म्हणुन मिळाल्या शिरा आणि उकडल्या हरभ-याचे द्रोण संपवुन... दिवस वर आल्याने गर्दीने भरलेल्या जत्रेत तिथल्या तिथं उभ्या उभ्या उरकलेला दाल वडा ..लेमन राईस... एनर्जी ड्रिंक.. असा अल्पोपहार... या छोटया रिचार्ज नंतर जवळच राजाराम महाराजांनी बांधलेल्या तलावाची पाहणी करत पुन्हा परतीच्या वाटेवर पाहिलेला किल्ले जिंजीच्या पाहणीचा शेवटचा टप्पा पॉडेंचेरी गेट सारख्याच बांधणीचा “वेल्लोर गेट” ...



# वेल्लोर गेट



वेल्लोर गेट



गेट समोरील भक्कम बुरुज

वेल्लोर गेट पाहुन थेट गाठलेलं हॉटेल... दुपारी दिडपर्यंत उरकलेली सामानांची बांधाबांध ... रायडींग करीताचा सगळा ऐवज देहावर चढवुन जिंजी ते वेल्लोर या ९३ किलोमीटरच्या दुस-या राईडसाठी पावणे दोन ला सोडलेलं जिंजी शहर..


जिंजी – चेटपेट – अर्णी - वेल्लोर या टप्प्यात अर्णी येईपर्यंत भुकेने थांबलेल्या गाड्या..... मागवायला आणि भाषेत कळायला सोप्प म्हणुन मागवलेली बिर्याणी ... तिचा केळीच्या पानावरचा सरंजाम मग एकत्रित केलेला बिस्मिल्लाह.... जेवण उरकुन गार पाण्याच्या दोन दोन बाटल्या बॅगेत भरुन लागलीच ४.३० ला गाठलेलं वेल्लोर शहर... थेट किल्ल्यात गाड्या जात असल्याने तिथल्या म्युझियम समोर पार्क केलेल्या गाड्या... अर्ध्या तासात पाहुन घेतलेलं म्युझियम त्यानंतर तिथेच मुक्काम म्हणुन किल्ल्याजवळ बुक केलेलं पुन्हा ३ खोल्यांचं विथ टेरेस गेस्ट हाऊस ... स्नानसंध्या... सामानांची खोलाखोल... सोबत आणलेल्या स्पाईक गार्ड वर फ़ोन क्यामेरे चार्जिंग ला लावुन संध्याकाळच्या फ़ेरफ़टक्याला सहाला पुन्हा वेल्लोर किल्ल्याकडे मार्गक्रमण...




अय अण्णा ..रस्सा आण...


# वेल्लोरचा किल्ला

कृष्णा जिल्ह्याच्या उत्तर सरहद्दीकडील मराठ्यांच्या पराक्रमाच्या पाऊलखुणांचं वेल्लोर शहर आणि १६७७ ला हबशी किल्लेदार अब्दुल्लाखान याच्या चिवट प्रतिकारानंतर किल्ल्यासमोरील दोन डोंगरावर साजरा आणि गोजरा हे जुळे दुर्ग बांधुन सन १६७८ मध्ये शिवरायांनी काबीज केलेला शहरातला बळकट तटबंदी व बेलाग बुरुज ही बलस्थानं असलेला वेल्लोर किल्ला...





किल्ल्याच्या तटबंदीवरुन संध्याकाळ...

किल्ल्यात जलकातेंश्वराचं प्राचीन मंदिर आणि किल्ल्याभोवतलचा परीसरात गार्डन असल्याने किल्ले परीसरात जत्रेसारखी गर्दी... फ़ेरीवाल्यांची रेलचेल.. तिथे घोटभर चहा घेऊन झाल्यावर विझत चाललेल्या सुर्याच्या साक्षीने स्वराज्य उजळलेल्या वेल्लोर किल्याच्या तटबंदीवरुन एक पुर्ण प्रदक्षिणा .... ती झाल्यावर किल्ल्यातील जलकातेंश्वराच्या मंदिराकडे वळालेला मोर्चा ... दक्षिण भारतीय पद्धतीचं बांधकाम... मंदिराच्या गोपुरांवर केलेली विजयनगराच्या कलेतली सुंदर कलाकुसर... मंदिराच्या आवारातील दगडी खांबांवर कोरलेले विविध प्राणी, काल्पनिक प्राण्यांवर बसलेला योद्धा, अनेक युद्धप्रसंग ...संपुर्ण मंदिर परीसर, जलकांतेश्वर दर्शन ... धर्मसभामंडप ...



जलकांतेश्वर मंदिर





इतर देव देवतांची मंदीरं पाहुन झाल्यावर तासभर तिथे पाहिलेला पोंगल सणानिमित्त आयोजित साधारण दिडशे कलाकारांचा भरतनाट्यम हा संस्कृती दर्शनाचा कार्यक्रम ...

मंदिराशिवाय किल्ल्यात असलेली मशीद, टपाल कार्यालय, चर्च, भारतीय पुरातत्व विभागाचं कार्यालय आणि संग्रहालय पाहुन झाल्यावर साडेआठला पुन्हा येऊन गेस्ट हाऊसवर भरलेली सभा ... गडवाटक-यांनी राजधानी किल्ले रायगडावर साजरा केलेल्या शंभु राज्याभिषेक सोहळ्याची व्हीडियो कॉल माहिती वार्ता... इथल्याही मोहीमेची दिलेली खबरबात ख्याली खुशाली... मग १०.०० ला जेवण उरकुन... रुम बाहेरच्या टेरेस वर टाकलेल्या गाद्यांवर मोकळ्या आभाळ चांदण्यातल्या गप्पा... थोडाफ़ार मोहीमेचा हिशोब ... जुळवाजुळवी ... झालेल्या टप्प्यांची उजळणी... तसंच येणा-या टप्प्यांची आखणी... उद्याच्या मोहिमेत महत्वाचे असे छ. शिवरायांनी आज पाहिला वेल्लोर जिंकण्यासाठी बांधलेले साजरा – गोजरा हे दोन जुळे किल्ले असल्याने वेळ न दवडता लवकर झोपेच्या स्वाधीन केलेलं देह....






# दिवस तिसरा

सकाळी ५ ते ७ चा दैंनदिन कार्यक्रम उरकुन... इथेही संध्याकाळपर्यंत बुकिंग सोय असल्याने... बॅगा तशाच ठेवुन... वेल्लोर स्पेशल चहासाठी गेस्ट हाऊसखाली उतरत एक एक जण चहा बन मस्का घेता झाला .... अवघ्या १५ मिनिटावर असलेल्या सी.एम.सी हॉस्पिटल मार्गे शहरातल्या डोंगरकड्यालगतच्या TKV नगराच्या लहानशा गल्लीत गाड्या थांबल्या तेव्हा सगळ्यांच्या अंगावरच्या खाकी रंगाच्या कार्गो पॅन्ट्स पाहुन आर्मी वाले आहात का ? अशी आम्हाला झालेली तर पुन्हा भाषेची जुळवाजुळव करीत साजरा आणि गोजरा या दोन्ही किल्ल्यांच्या मधोमध जाणारी खिंड शोधण्यासाठी आम्ही त्यांना केलेली निष्फ़ळ विचारपुस.... अखेर एकदाचा साजराचा पायथा मार्ग सापडल्याने त्या जवळच पार्क केलेल्या गाड्या... तिथले दिवंगत जेष्ठ राजकारणी MGR यांच्या त्या दिवशीच्या जयंतीदिनानिमित्तच्या बॅनर खाली आम्ही पार्क केल्या चार गाड्या तिथल्या जेष्ठ मंडळीनी हटकल्याने त्या दुस-या जागी पार्क करुन ... सकाळी ७.३० च्या सुमारास सुरु केली साजरा चढाई....







साज-याचा दरवाजा



हर...हर.. महादेव..

# किल्ले साजरा

जिंजीने दोन दिवसांत पायाला आणलेल्या गोळ्यांनी साजरा तसा अवघड करावा... पण शेवटी केलेली जिकिर कातळवाटांचा चढ रस्ता ओलांडत पाठिला संपुर्ण वेल्लोर शहर आणि शहराच्या मधोमध नजरेच्या टप्प्यात येणारं वेल्लोर किल्ल्याचं देखणं दृश्य पाहता महाराजांनी हे दोन जुळे का बांधले याची आलेली प्रचीती... या दोन्ही किल्ल्यांवरुन मराठ्यांनी तोफ़ांची सरबत्ती करुन वेल्लोर किल्ला ताब्यात घेतला... तासाभरात गड माथा गाठुन पाहिलेली तटबंदी... वाड्याचे अवषेश... किल्ल्यावरील विहिर... विहिरितले गणपतीचे शिल्प... माशाचे शिल्प आणि पहा-याच्या चौक्या..


साजरा “साजरा” झाला....

लहानग्या वाटाड्या सोबत बापू



बुरुज आणि किल्ले पठाराची आणखी तासाभरात फ़ेरी... समोर दिसणारा गोज-याचा डोंगर आणि थोड्याफ़ार तटबंदीचा किल्ले गोजरा... दिसत जरी समोर असला तरी त्यासाठीचा रस्ता शोधणं हे पुन्हा नवं आवाहन... पुन्हा अनिकेत वाघ आणि अमर साळुंखे या दोघांना GPS Locations Whatsapp वर शेयर केल्यानंतर त्यांनी सुचवलेल्या मार्गाने पुढे गेलेले तर ...



इथुन एक भुयार डायरेक बोईसर ला निघतं - बर्वे

इतर किल्ल्याच्या पाहणीत मागे राहिल्याने साज-याला जोडुन मधल्या दोन डोंगरातुन वर तिरप्या रस्त्याने गोज-याकडे जाणारा दुसरा असा शंकर बापु, संक्या, मी, सुधीर आणि किरण माळी ने धरलेला रस्ता.... वर माथ्यावरुन सोप्पा वाटत असलेल्या.. चढता चढता दमछाक नाही पण काट्यांच्या वाटांनी जेरीस आणणा-या बारीक काट्यांच्या झांडानी देहभर ओरखड्यांनी अगदीच अवघड केलेला गोजरा... पलीकडच्या कड्यावर दुस-या रस्त्याने चढणा-या दोस्तांच्या नावे दिलेल्या आरोळ्या त्यांचे साद ... त्याचा एको.... नवा मार्ग शोधत असताना मध्येच चुकीच्या खडकावर चढलेले बापु आणि संक्या तो उतरताना उडालेली सातमजली धम्माल... मध्येच फ्रि क्लाईंब.... झुडुपातुन झोपुन... रांगत ... धडपडत... दिड तासांच्या या अवघड सफ़रीनंतर झाडा वेलीने आच्छादलेली तटबंदी... ती झाडाच्या फ़ांद्याच्या आधारे काबीज केल्यावर ... लगेचच लागलेल्या किल्ल्याच्या पडक्या अवशेषाच्या सावलीत अंग टाकुन घेतलेली विश्रांती आणि उरलेल्या पाण्याचे शेवटचे घोट .... मध्यान्हीचे १२.०० वाजले तरी दुस-या मार्गाने येणारी फ़ळी अजुन बरीच मागे असल्याचा अंदाज आल्यावर किल्ल्याचा मारलेला फ़ेरफ़टका ...


## किल्ले गोजरा

किल्ल्यातील खंदक .... प्रशस्त भुयार... जराफ़ार राहिलेली तटबंदी ... दुसरी फ़ळी पोहोचल्यावर दोन्ही मार्गांच्या अवघडतेचे ...झालेल्या त्रासाचे अभिमान आणि कौतुक... एकत्रित पाहिलेला बुरुज ... वाड्याचे अवषेश ... वेल्लोर कडे उघडणारा दरवाजा,शौच कुप,धान्याची कोठारं, पहारेक-यांच्या चौक्या..विहिर, तटबंदी, दरवाजात कोरलेलं छं शिवरायांचं शिल्प.. मागच्या बाजुने चढल्याने वेल्लोरकडे उघडणारा दरवाजा ... आणि गोज-यावरचे पाहणीसाठी विशेष असे त्या दरवाजाच्या देवडीत छ. शिवराय महाराजांचे कोरीव शिल्प... तिथं विक्याने दिलेली सन्माननीय वंदना गारद ...





छ. शिवरायांचे शिल्प



वेल्लोर कडे उघडणारा दरवाजा

दुसरी फ़ळी आली त्या रस्त्याने उतरायला घेतलेला गोजरा.... मोठ्या मोठ्या खडकावरुन घसरगुंडीच व्हावी असा विना पाण्याचा तासाभरात उतरलेला किल्ले गोजरा... किल्ला उतरल्यावर लागलेल्या टपरीवरुन घेतलेले पाण्याचे पाऊच .....गाडी लावलेल्या ठिकाणाहुन फ़ार लांब आल्याने चालतच पुन्हा गाठलेली TKV नगरातली ती गल्ली... पाण्याच्या आणि भुकेच्या ओढीने खटाखट पडले गाड्यांचे सेल्फ़ आणि गेस्ट हाऊसकडे कूच... भर उन्हाने आणि काट्यांच्या वाटांच्या दोन्ही किल्ल्यांनी अंग चावायला उठल्याने थेट अंघोळीसाठीची प्रत्येकाची लगबग मग जेवणाची तगमग ... चांगलीच दुर्गभ्रमंती झाल्याने तिथेच समोरच्या पंजाबी हॉटेलात दुपारचे चांगलेच घेतलेलं भरपेट जड आणि पंजाब स्पेशल मठ्ठयाच्या प्रत्येकी दोन दोन ग्लासाने पुर्ण केलं जेवण... बॅंगलोर मुक्कामी निघण्याआधी तिथेच घेतलेली निवांत झोप....

सायंकाळी ७.०० वाजता प्रत्येकी एक कट चहा उडवल्यावर २१३ किलोमीटर च्या बॅंगलोर साठी वेल्लोर – अंबुर – कृष्णगीरी – होसुर – बॅंगलोर मार्गाचा प्रत्येकाला शेयर केलेला GPS Route... सुस्साट हायवे आणि भन्नाट गारव्यानंतर... होसुर ला चहासाठी ठरलेला थांबा ... तिथल्या पेट्रोल पंपावर टाकी फ़ुल्ल झालेल्या गाड्या पुढे थांबल्या ते ऐन बॅंगलोर शहारात आल्यावर बाईक लाही असलेला टोल.. गाडी चालवल्या हयातीत पहिल्यांदा भरलेल्या टोल नाक्यावरच... टोल रस्त्याने जायचं कि नाही या गोंधळात झालेली चुकामुक .... शहरातल्या मुख्य रस्ता फ़्लायओव्हर वरुन अवघं शहर पार करीत असल्याची जाणिव होत असल्याने आणि मुक्कामी ठरलेला आबासाहेबांचा भर शहर बॅंगलोरातला “कापसे” नावाचा सहा मजली वाडा मागे राहिला असं GPS Location वर कन्फ़र्म झाल्यानंतर घेतलेले यु टर्न ... जेवणाची सोय करायला मागे थांबलेल्या आबाच्या आदेशानुसार पोरांनी शोधुन काढलेला पत्ता .... पण नेमका चौक चुकल्याने आम्हाला शोधत आलेला आबाचे बंधुराज केशव कापसे... मग त्याच्या मागोमाग गाठलेला मुक्काम... प्रशस्त फ़्लॅट... अगदीच शाही सोय आणि सरंजामी थाट... बॅंगलोरचा पाहुणचार जोरात होणार अशी प्रत्येकाला फ्रेश होत झालेली खात्री... आबाने पार्सल आणलेल्या बिर्याणीवर एकत्रित ताव.... आणि उद्याचा कमी दगदगीचा दिवस असल्याने वाढलेल्या गप्पांच्या फ़डाचा वेळ... आणि गारठ्याची उशीराने झोप....



## ४ दिवस चौथा




आजच्या दिवसात सुट असल्याने सकाळी निवांत ७.०० चा उठाव ... गीझर ची सुविधा असल्याने चार दिवस सराव पडल्या अंगाला गरम पाण्याच्या शॉवर चे स्वर्गसुख  मग ९.०० पर्यंतची आवरा-आवर ... चहा..  बॅगा तशाच फ़्लॅटवर ठेवुन भर शहर भटकण्यासाठी आणि बॅंगलोरच्या किल्ल्याकडे जाण्यासाठी आबाच्या बंधुने दाखवलेला अर्धा आणि अर्धा GPS Route च्या भरवशावरचा... १३ किलोमीटर च्या रस्त्यासाठी सव्वा तासांचा वेळ दाखवल्यावरच तिथल्या ट्रफ़िक चा आलेला अंदाज... शहर कुठलंही असो.. अशिक्षित असो वा सुशिक्षित गाडी चालवण्याची स्वयंशिस्त हेही शहर पाळत नाही ही प्रचिती... तब्बल ११.३० ला गाठलेला बॅंगलोरचा किल्ला... चौकातल्या स्पेशल डोसा कॉर्नरवर उभ्या उभ्या उरकलेला इडली डोसा चहा नाष्टा... आणि बॅंगलोर किल्ल्यात केलेला प्रवेश


## बॅंगलोर (बॅंगलोर भुईकोट)

सन १५३७ मध्ये विजयनगरचे सामंत केंपेगौडा यांनी बांधलेला.. विजयनगरच्या पाडावा नंतर मराठे , मुघल, म्हैसुर साम्राज्य आणि इंग्रजांच्या हुकुमतीत राहिलेल्या बेंगलोर शहरातला.. गोलाकार बुरुज.. भक्कम तटबंदीचा आणि मुख्यत्वेकरुन इंग्रजांना कैद ठेवण्यासाठी वापरण्यात आलेला भुईकोट



मुख्य दरवाजा




पाहणीला किल्ला लहानच असल्याने अर्ध्या तासाच्या पाहणीनंतर चालत १० मिनिटावर असल्याने पर्यटन स्थळ असलेल्या टिपु सुलतानाच्या महालाकडे वळालेला मोर्चा...

# टीपू सुलतान महाल

एन्ट्री पासेस काढुन झाल्यावर पहिल्यांदाच अंध व्यक्तींसाठीचे ब्रेल लिपीतला माहीती फ़लक पाहुन..सगळ्यांचे महाली प्रवेश....




ब्रेल लिपितला माहीतीफ़लक





आजच्या दिवसाचे टप्पे संपल्याने





महालातच तासभर काढलेला वेळ ...
तिथुन तासभर पुन्हा ट्रफ़िक रस्ता पार करत आबासाहेबांच्या बॅंगलोरात असलेल्या दुस-या राजवाड्यावर आबाच्या नातेवाईकांसोबत घेतलेला चहा... गप्पा.. जेवणाचा फ़ारच आग्रह झाल्याने दुपारच्या जेवणासाठी त्यांनी रिझर्व केलेलं शाही हॉटेल... पोट भरुन जेवण ...



कापसेंचा पाहुणचार

जेवणानंतर फ़क्त ९ किलोमीटर पण भर रस्ता ट्रॅफ़िक ने तासभर लांबवलेला रस्ता .. तिथल्या मार्केटात खरेदीला गेल्या विलासदा, शंकर बापू, उर्जा, बारका बापू यांनी लावलेल्या उशीरात आम्ही वाढवुन घेतली दुपार ते संध्याकाळ निवांत झोप... त्यानंतर कापसे कुटुंबांच्या पाहुणचारताला शेवटचा चहा, बिस्किटे उडवल्यावर त्यांचा वत्सल निरोप आणि पुढचा टप्पा आणि त्या दिवशीचे मुक्कामी गाव सिरा कडे कूच..



भाऊ मराठा अमर साळुंखे यांची भेट

बॅंगलोर ते सिरा या १४२ किलोमीटच्या प्रवासात मधल्या २५ किलोमीटर हायवेसाठी बाईकचे प्रत्येकी ६० रुपयाचा टोल भरुन येणा-या नाईस रोड वर या मोहीमेत सर्वतोपरी फ़ोनवरुन तत्पर स्थळ , मार्ग, नकाशे तथा माहीती देणारे अमर साळुंखे उर्फ़ भाऊ मराठा यांची आपुलकीची आवर्जुन भेट... सोबत चहा... त्यांना निरोप दिल्यावर अंधार भरल्या हायवेवरुन थेट रात्री साडेअकराला गाठलेलं सिरा गाव आणि गाव ओलांडुन पुढे हायवेवर शोधलेला आबाच्या काकांनी सुचवलेला मुक्कामासाठीचा गुरुजीत ढाबा ...

रस्त्यातल्या गारठ्याने शरीराचं सरासरी तापमान बिघडविल्याने बॅगा टाकल्यावर किचन मधील तंदुर भट्टीवर शेकोटी... तेव्हाच बनवलेलं ताजं जेवण .. गार वा-यात उबेला मिळालेले रग.. आणि पाचव्या दिवसाच्या किल्ले सिरा , दोड्डेरी गढी , होदेगीरी , चेन्नगीरी, चित्रदुर्ग या २५७ किलोमीटर भल्या लांब पल्ल्यासाठी सेट झालेले अलार्म, आणि शांत झोप.

## ५ दिवस पाचवा

पहाटेचा गारठा वाढल्याने आज अंघोळीला दिलेली रजा, गरम पाण्यात ब्रश करुन तशीच चोळलेली तोंडं घेऊन पुन्हा माघारी सिरा गावाकडे केलेलं मार्गक्रमण... सकाळी ७.०० ला गाठलेला किल्ले सिरा ...




सिरा किल्ल्यातली सकाळ

# सिरा (सिऱ्याचा किल्ला )

सतराव्या शतकातल्या नायकांनी बांधलेला... महत्वेकरुन “कस्तुरी रंगाप्पा नायक” या वीराच्या पराक्रमाचा ऐतिहासिक साक्षीदार... १६३८ ते १६८७ विजयनगर साम्राज्यात... १६८७ ते १७५७ मुघल साम्राज्य.. १७५७ ते १७५९ मध्ये मराठा साम्राज्य ... १७९९ नंतर १९४७ पर्यंत इंग्रजांच्या ताब्यात राहिलेला सिरा किल्ला...

दगडी तिहेरी तटबंदीच्या किल्ल्याला गोलाकार खंदक... दगडी छताचा मुख्य दरवाजा... पहारेक-यांच्या देवड्या..बाईकवरुनच तटबंदीच्या कडे कडेने त्याकाळी खंदक असलेल्या रस्त्याने किल्ल्याभोवती गोल प्रदक्षिणा... पुन्हा मुख्य दरवाजाने किल्ल्यात प्रवेश... संपुर्ण फ़ेरफ़टका ... तटबंदीवर बाईक नेता येत असल्याने पुन्हा तटबंदीवरुन प्रदक्षिणा..



दगडी तटबंदी



मुख्य दरवाजा



दरवाजावरील दगडी छत



सिरा गावातच चहा नाष्टा उरकुन पावणे नऊ च्या दरम्यान सिरा ते दोड्डेरी च्या गढीसाठी शेयर झाले ट्रॅव्हल रुट...

दहाच्या ठोक्याला गाठलेली गढी तिथं उरलेला एकमेव साक्षीदार बुरुज ... तिथं विक्याने स्वराज्याचे सेनापती संताजी घोरपडे यांच्या इतिहास प्रसिध्द दोड्डेरी च्या गढीच्या युध्दपराक्रमाची सांगितलेली गाथा...

# दोड्डेरी ची गढी

सेनापती संताजी घोरपडे यांच्या आयुष्यातील सुवर्ण पान (संकलन – विक्रांत गायकवाड)

संताजी कर्नाटक मध्ये शिरल्या शिरल्या त्याने बेळगाव पासून ५२ मैलावर असणाऱ्या रामदुर्ग किल्ल्याला वेढा दिला. बादशाह संताजीच्या हालचालीवर खास लक्ष ठेऊन होता, त्याने तातडीने विजापूर चा सुभेदार नसुल्लाखान यास रामदुर्ग च्या मदतीला पाठवला आणि विजापूर -कर्नाटकचा फौजदार हिंमतखान बहाद्दूर याला संताजीच्या पाठलागावर पाठवलं. पण त्या आधीच संताजी रामदुर्ग सोडून दक्षिणेकडे गदगच्या दिशेनं निघाला होता. ९ नोव्हेंबर च एक संताजीच पत्र उपलब्ध आहे. इथल्या देशमुख-देशपांड्यांना लिहलेला सेनापतीचा तो एक जाहिरनामाच होता. पुढे संताजी कोप्पल च्या प्रदेशातून तुंगभद्रा ओलांडून चित्रदुर्ग परिसरात आला. चित्रदुर्ग चा बरमाप्पा नायक  फौजाशी लढत होता. मराठा सैन्य येताच त्यानं त्यांचं स्वागत केलं आणि सारी हकिकत संताजी ला सांगितली. संताजी ने पूर्ण प्रदेशाची माहिती गोळा केली, कर्नाटकी हरकारे मराठा गुप्तहेरांना सहकार्य देत होते. संताजी ला स्थानिक लोकांच फार सहकार्य लाभलं. यावेळी भीमेकाठी बादशाहाची छावणी होती, त्याने संताजी च्या मागावर सरदार पाठवले कारण त्याला भीती होती की एकदा संताजी जिंजी पर्यँत पोहोचला तर मोगलांना खूप मोठा फटका बसणार होता. बादशाह ने सीऱ्याचा फौजदार कासीमखान याला कळविले " पाहिजे तेवढी सर्व मदत पाठवत आहे पण संताजीला कैद करा किंवा ठार मारा, ताबडतोब संताजीची वाट अडवावी, कोणतीही हयगय करू नये."

बादशाहने कासीमखानच्या मदतीसाठी बरेच मातब्बर सरदार पाठवले. ख्वाज़ाखान, खानाजादखान उर्फ रहुल्लाखान, सफाशीकनखान, सय्यद असालतखान, महंमद मुरादखान, मिर्झा हसन, खाफी महंमदखान यांच्या बरोबर बादशाही छावणीतील व बादशाहाच्या निकट खास असलेल्या खास निवडक चौकीतील निवडक मनसबदार, हप्त चुकीतून निवडलेले मुबलक सैन्य, भारी तोफखाना सोबत शाहजादा कामबक्ष आणि त्याची फौज सोबत होती. दक्षिणेतील आणि कर्नाटकातील सरदार हिमांतखान, हिमुद्दीनखान आणि रुस्तमदिलखान यांना हि सक्त हुकूम गेले होते. सर्वजण मिळून संताजी विरुद्ध मोहीम काढणार होते.

संताजी चे सैन्य मुख्य छावणी पासून २०-२५ मैलावर होते. भल्या पाहाटे मराठा सैन्य ठरल्याप्रमाणे छावणी जवळ आणि पेशखान्याजवळ येऊन थांबले. बाकीची दुसरी तुकडी चलकेरी व तलाखु रस्त्याच्या दोन्ही बाजूला जंगलात हल्ल्याची वाट बघत होते. आणि काही मुख्य अधिकारी, गोफणवाले, बंदूकधारी आणि बाणवाले उंचवट्याच्या जागांवर बसले होते. प्रत्येक टोळी बरोबर एक शिंगवाला इशाऱ्यासाठी ठेवण्यात आला होता.

ठरल्याप्रमाणे पहिल्या तुकडीने पेशखान्यावर हल्ला केला आणि पेंगुळलेलें सैन्य गारद केले. अर्धे मेले, काही जखमी झाले तर काही मुख्य छावणी कडे पळाले. मुख्य छावणी कडे जाणाऱ्या सैन्याला मराठयांनी अडवले नाही कारण हा संताजीच्या युद्धाचा एक भाग होता. बाजार-बुणगे व स्वयंपाक करणारे रानोमाळ पळत सुटले. मराठयांनी मोकळ्या पडलेल्या पेश खान्यावर यथेच्छ हात साफ केला. जेवढ खाण्यायोग्य होत तेवढं सामान जंगलात नेऊन लपवून ठेवलं आणि जे उपयोगी नव्हतं ते घोड्यांच्या पायाखाली तुडवलं आणि तंबूला आग लावून दिली.

पळून गेलेल्या सैन्याने कासीमखान ला बातमी दिली आणि कासीमखान आपल्या सैन्यानिशी मराठयांवर चालून आला. पण मध्येच जंगलात दडून बसलेल्या सैन्याने कासीमखान वर दोन्ही बाजूने हल्ला केला. तोपर्यंत पेशंखान्यावरील मराठ्यांची तुकडी आपलं काम संपवून यांना मिळाली आणि एकच हल्ला केला. कासीमखानची भांबेरी उडाली. कासीमखान ने शहाणपणा करून काही घोडेस्वार छावणी कडे मदतीसाठी पाठविले त्यांना हि मराठ्यांनी अडविले नाही. कारण ही बातमी छावणी वर जावी आणि मुख्य छावणी वरील सगळे मोगल लढाईच्या मैदानात यावेत आणि छावणी मोकळी पाडावी हा संताजींचा डाव होता. आणि तसंच झालं.

कासीमखान घेरला गेलाय हे समजल्यावर शाही सरदार-पाहुणे सगळे आपापली फौज घेऊन कासीम खान च्या मदतीला आले आणि संताजीच्या वेढ्यात सापडले. मराठयांनी एकच बोंब केली. मोगलांनी प्रतिकाराचा जोर केला पण तो दिवस मराठ्यांचा होता आणि जोर सुद्धा मराठयांचा होता.

पौष शु।। एकादशीचा दिवस भल्या पहाटे पर्यंत भरपूर चंद्र प्रकाश होता. या प्रकाशात मराठे आपल्या जागा अश्या बदलत होते जसं काय पूर्ण सूर्य डोक्यावर होता. सरस मराठे उंचवटे, झाड अंधारात सुद्धा झटापट बदलत होते. यामुळे मोगलांना नक्की काय प्रकार आहे आणि कुठून हल्ला होतोय हे समजत नव्हतं. मराठयांनी चंद्रप्रकाशात निम्मी लढाई मारली, मराठ्यांचा मारा ९९ टक्के मारक होता. भरपूर दगड जमा करून ठेवले होते. एकच गोफणवाला अनेक ठिकाणी मोर्चे बांधून मारा करत होता. मराठयांनी एकही मशाल वापरली नव्हती उलट मोगल मशाली घेऊन लढत होते यामुळे त्यांना मराठे दिसतच नव्हते. शेवटी मोगल जीव वाचविण्यासाठी पळत होते. याच गडबडीत तिसऱ्या टोळीने जाऊन मुख्य छावणी लुटली. सोने-चांदी-हिरे, जडजवाहीर, पैसा, धान्य, भांडी जेवढ शक्य तेवढं लुटलं.

कासीमखान तर पक्का उघडा पडला, पेशखान्याची छावणी आणि मुख्य छावणी दोन्ही बरबाद झाल्या पण मोगलांचा दारुगोळा हि मराठ्यांच्या हाती आला. आता मराठ्यांच्या सगळ्या तुकड्या मुख्य रणांगणावर आल्या आणि बेभान होऊन मोगलांवर तुटून पडल्या. मोकळ्या मैदानावर मोगलांना पळायला सुद्धा जागा शिल्लक ठेवली नाही. शेवटी

दुसऱ्या दिवशी मराठयांनी मोगलांना कोंडण्याचा बेत आखला आणि त्यांना रेटीत दोन-अडीच मैल मागे दोड्डेरी च्या गढीत नेऊन कोंडले. मोगल तर पार संपून गेले होतेच पण त्यांचे मुख्य सरदार तर पळून गेले होते.

चित्रदुर्ग च्या बरमाप्पा नायकास कासीमखान ने खूप सतावले होते. त्यामुळे त्याने संताजीच्या मदतीला सूड उगविण्यासाठी मोहिमेच्या सातव्या आठव्या दिवशी ८ हजार कर्नाटकी सैन्य आणि बरकांदार खूप दारू-गोळ्यासह पाठवले. यामुळे मराठयांना आराम मिळाला आणि ताज्या दमाचे सैन्य मोगलांवर गोळीबार करू लागले. याचवेळी बादशाह ने कासीमखान च्या मदतीसाठी हिम्मतखान बहाद्दूर याला पाठविले. हिम्मतखान येत आहे असं समजताच संताजी ने मुख्य सरदारांना गढी भोवती ठेवून स्वतः मोजकी फौज घेऊन समाचाराला निघाला पण वाटेत त्याला समजलं की राजाराम महाराजांनी हिम्मतखानाचा परस्पर बंदोबस्त करून त्या पळवले व तो बसवापट्टणच्या गढीत जाऊन बसला. तेंव्हा संताजी पुन्हा मागे फिरला.( यावेळी धनाजी जिंजी किल्यातच होता. राजाराम महाराजांनी हिम्मतखानाचा बंदोबस्त केला हि गोष्ट राजाराम महाराज, संताजी आणि धनाजी यांच्या संबंधावर प्रकाश टाकण्यास फार महत्वाची आहे.)

नव्या दमाच्या कर्नाटकी सपाट्यात ४-५ हजार मोगल ठार मेले. तेंव्हा मराठ्यांना दया आली आणि त्यांनी गोळीबार थांबवला. मैदानावर मोगलांवर लक्ष ठेवणे मराठयांना थोडं अवघड जात होतं , मोगल गढीत सापडल्याने एकाच दरवाज्यावर लक्ष ठेवणे सोपं झालं.

गढीत फार वाईट अवस्था झाली. दोन दिवसात सगळं धान्य संपल, जनावरांचा चारा संपला. शेवटी मोगल दोरीने पिशव्या खाली सोडत आणि मराठे पैसे घेऊन त्यांना मूठ-मूठ धान्य देत होते. शेवटी पैसे हि संपले आणि मोगल एकामेकांच्या जीवावर उठले. हत्ती-गुरं-उंट जे खाता येईल ते खाऊन दिवस काढू लागले. आपल्या सैन्याची दुर्दशा पाहून कासीमखानने विष खाऊन आत्महत्या केली.

शेवटी मोगलांच्या मोठ्या सरदारांनी एकत्र येऊन संताजीला शरण जाण्याची सूत्र हलवली आणि खानजादाखान चा दिवाण तहाचा प्रस्थाव घेऊन संताजी कडे गेला. तह संताजी जे म्हनेल तसा झाला. ' तुमच्याजवळ जे काही असेल, हत्ती-घोडे-उंट-हत्यारे-नगद याशिवाय सात लाख होन एवढी रक्कम घेईन. मग सोडीन ' अस म्हणून सरदारांच्या मुलांना ओलीस ठेऊन बाकीच्यांना सोडून दिले. गढीतून बाहेर येताना प्रत्येकाच्या हातावर २ भाकऱ्या आणि अरजन ची उसळ( हरभरा सारखे धान्य) दिले. सगळं मोगल सैन्य अधोनीच्या किल्ल्यात नेऊन सोडलं तिथे रुस्तुमदिल खान ने त्यांची व्यवस्था केली. १६ दिवस अंथरूण सोडाच पण साधी चादर पांघरायला नाही ते हि डिसेंबर च्या थंडीत.

खास बादशाहाच्या उमरावांना अशी वेळ यावी याशिवाय दुसरा अपमान कोणता असेल.? छत्रपतींच्या गनिमी काव्याने मोठ-मोठ्या मोगली फौजांना दाती तृण धारायला लावणारा संताजी कोणी साधारण सरदार नव्हता. नुसत्या संताजी च्या नावाने मोगली फौजा रस्ता वाकडा करायच्या किंवा मागे फिरायच्या. संताजी दक्षिणेत असे पर्यँत मोगलांनी मोहिमा रोखल्या होत्या. आज कर्नाटक मध्ये सुद्धा संताजींचा पराक्रम सांगितला जातो. मोगल बातमीदार आणि इतिहास अभ्यासक म्हणतात की या लढाईत एकूण ७० लाखांची लूट मराठ्यांच्या हाती पडली होती.

चित्रदुर्ग भागात एक कानडी पोवाडा खूपच लोकप्रिय आहे. यामध्ये बरमाप्पा नायकाची लोकप्रियता सांगितली आहेत पण मराठयांनी केलेल्या मोगलांच्या हालाचे वर्णन मुद्देसूद केले आहे.

प्रवास वर्णन करणारे म्हणतात की , " शिवाजी महाराज यांनी गनिमीकावा शोधला असेल तर संताजी ने त्याचा जास्त वापर केला."






गढी सोडल्यावर होदेगीरीच्या नकाशात मधोमध येणा-या चित्रदुर्गाकडे निघालेल्या गाड्या ... चित्रदुर्गातल्या नाक्यावर पुन्हा पेटभर चहा नाष्टा ..



पुढे असल्याने पुढे निघुन गेलेले आणि होदेगीरीत आमच्या आधी पोहोचुन पावर नॅप उरकणारे संक्या आणि विलासदा होदेगीरीत भेटले तेव्हा मध्यान्हीचा वाजलेला एक .. “स्वामींची समाधी कुठंय”? हे विचारल्यावर तिथल्या तालुका ते गावा गावातल्या कुणालाही विचारल्यास ठाऊक असलेली स्वराज्य संकल्पक श्री शहाजी महाराजांची समाधी...


# शहाजी राजे समाधी - होदेगिरी



शहाजी महाराज समाधी


समाधीवर पुष्प आणि नतमस्तक नमन अर्पण करुन तिथुन जवळच ९ किलोमीटर पुढे असलेल्या किल्ले चेन्नगीरी साठी सुपारीचं शहर म्हणुन प्रसिद्ध असलेल्या गाव चेन्नगीरी च्या दुतर्फा सुपारीच्या बागांमधुन गेल्या रस्त्यावर भरधाव हाकलेल्या गाड्या आणि दहाव्या मिनिटात गाठलेला किल्ला

“किल्ले चेन्नगीरी”


चेन्नगीरी शहर


# किल्ले चेन्नगिरी

केलाडी नायका साम्राज्याची राणी “चेन्नमा” हीच्या नावावरुन नामकरण केला गेलेला.. सन १७७० मध्ये बांधलेला किल्ला “चेन्नगीरी” ... किल्ल्यात सद्य स्थितित रंगनाथाचं मंदिर...दगडी रथ.. भक्कम तटबंदी.. चारही बाजुला भव्य बुरुज... आणि स्थानिक भाषेतील शिलालेख उपलब्ध..


चेन्नगीरी किल्ल्याची पाय वाट


किल्ल्यातला दगडी रथ

चेन्नगिरी भ्रमंतीनंतर पुन्हा माघारी होदेगीरी ते चित्रदुर्ग असा प्रवास ... रेल्वे क्रॉसिंगवर हुबळी पॅसेंजरने अडवलेला रस्ता... सुदैवाने चित्रदुर्ग शहरात आल्यावरच सुध्याच्या बुलेटची तुटलेली क्लच केबल...




तिची दुरुस्ती झाल्यावर .. दुपारी ३ ला चित्रदुर्ग पायथा ... पुरातत्व खात्याची तिकिटं... बॅगा ठेवण्याची सोय.. पाण्याच्या बाटल्या असे सगळे सोपस्कर पार पाडुन... किल्ला भला मोठा आणि पाहण्यासारखा (ठेवला) असल्याने तिथं सोबतीला घेतलेला गाईड... किल्ल्याच्या प्रवेश द्वाराजवळच भेटलेला आणि गाईडने ओळख करुन दिलेला सुप्रसिध्द कसरत पटू मंकी मॅन .. त्याने केलेल्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनंतर त्याला गृप तर्फे दिलेली पोचपावती.




जगप्रसिध्द फ्री क्लायंबर ज्योथी राज (मंकी मॅन)

## चित्रदुर्ग चा किल्ला


विजयनगर च्या बलशाली साम्राज्याचे प्रतिक... नायक घराण्याच्या राजवटीचा ..१८ व्या शतकाची बांधणी, अंदाजे १५ किलोमीटर परिघात १९ दरवाजे , ३५ आंतरद्वार, तितकेच चोरदरवाजे, १८ प्राचीन मंदिरे , राजवाडा, मोठी पाण्याची टाकी, भवती चौफेर ७ पदरी तटबंदी, जवळपास २००० बतेरी म्हणजे टेहळणीचे बुरुज अशा भव्यतेचा किल्ला चित्रदुर्ग




मुख्य दरवाजासमोर उजवीकडे एक मोठं दगडी चौरस आकाराचा हौद, बालेकिल्ला, धान्य कोठार, टेहळणी बुरुज वीरभद्रा मदेकरी नायक दरवाजा, पाचवा घंटा दरवाजा, कस्तुरी रंगाप नायक हिंदू मूस्लिम प्रतिक, वेळूर हलेबीर प्रतिक, झेंडा बुरुज, गणपती मंदिर ,हत्ती, ससा शिल्प , एकनाथाश्वरी दरवाजा, धान्य कोठार , हिडिंबेश्वर मंदिर, एकनाथेश्वरी मंदिर, सम्पिगे




सिद्धेश्वरा, फाल्गुनेश्वरा मंदिर, गोपाल कृष्णा, अंजनेया मंदीर (हनुमान), सुब्बराया मंदीर.. टाकसाळ आणि कचेरी असा भरभक्कम किल्ला पाहुन तो उतरेपर्यंत वाजलेले अंधारातले ७.३०...





हिडिंबेश्वर मंदिर





विष्णू आणि गणेश शिल्प



संध्याकाळ चित्रदुर्गावरची

चित्रदुर्ग शहरातल्याच हॉटेलचं बुकिंग .. रुमच्या चाव्या मिळाल्यावर..बॅगा सोडुन .. अंघोळ आणि चार दिवसात मळले कपडे धुण्याचा सामुहिक कार्यक्रम उरकल्यावर .. तिथल्या मार्केट मधे मारलेला फ़ेरफ़टका... तिथल्या प्रसिध्द मिठाया तसंच स्पेशल पदार्थावर मारलेला डल्ला... रुम वर परतुन आल्यावर सुरु असलेल्या क्रिकेट मॅचचे थोडंफ़ार विष्लेशण मग मोहिमेची उजळणी आणि गप्पा रंगल्याने मॅच बंद करुन सुरु ठेवलेली गप्पांची भट्टी... हास्यकल्लोळ आणि दोस्तीचा सोहळा...

रात्री उशीराने हॉटेलातल्याच रेस्टॉरंट मध्ये स्पेशल शाकाहारी थाळ्यांचं सुग्रास जेवण उरकुन ... झोपेच्या कुशीत संपवलेला सफ़रीतला पाचवा दिवस.

# ६ दिवस सहावा

आजच्या दिवसातल्या चित्रदुर्ग – होस्पेट – हम्पी – कोप्पल – गदग- कुंडगोल या ३४८ किलोमीटर प्रवासाचा रुट मॅप प्रत्येकाच्या मोबाइल वर शेयर केल्यानंतर थेट होस्पेटचा धरलेला रस्ता … दुरावस्था त्यात रस्त्याच्या कडेला चित्रदुर्ग या पवनचक्क्यांच्या गावाला जाणा-या पवनचक्क्यांच्या पंखांची ने आण करणारी लांबलचक अवजड वाहनांनी अवघड केलेला रस्ता…. त्याने झालेली चुकामुक… जसं मिळेल तसा या न्यायात साध्या टपरी वजा दुकानात उरकलेला चहा नाष्टा .. ११.०० ला बॅकवॉटर


सच्या ये तुझा सेल्फ़ी काढतो


आबासाहेब


तुंगभद्रा बॅकवॉटर

तर ११.३० ला होस्पेट आणि १२.०० ला गाठलेलं देखणं कोरीव हम्पी शहर. तिथं बॅगा ठेवण्यापुरती बुक करावी लागलेली रुम तिथं बॅगा ठेवुन लागलीच फ़िरायला सुरुवात



बाप्या….इंग्लिश नकाशा घे


# हम्पी


तुंगभद्रा नदीकिनारी वसलेलं विजयनगरच्या वैभवशाली साम्राज्याची साक्ष देणारं... युनेस्को च्या जागतिक वारसा स्थळात सामाविष्ट असं विजयनगरच्या राजधानीचं शहर “हम्पी’

विरुपाक्ष देवालय, विठ्ठल मंदीर, दगडी रथ, बडवी लिंग, उग्र नरसिंह, हजारराम मंदिर, कमल महाल, हत्तीशाळा, राणी स्नानगृह, राजमहाल, दहावर्षापुर्वीच्या उत्खननात सापडलेली पुष्करणी...


विठ्ठल मंदिर


विठ्ठल मंदिराचा मुख्य दर्शनी भाग


प्रसिध्द दगडी रथ






म्युझिकल पिलर्स










पुष्करणी





कमल महाल



हजारराम मंदिर शिल्प



विजय विठ्ठल मंदिर



डोन्ट वरी बी हम्पी

हम्पीतल्या महत्वाच्या स्थळांची भेट घेतल्यावर सायंकाळी ६.०० ला तिथल्या मार्केट मध्ये केलेला चहा नाष्टा थोडीफ़ार खरेदी ... रुमवरच्या बॅगा गाडीला बांधुन ... पुन्हा होस्पेट मार्गे वेल्लारी-हुबळी हायवेला येण्याआधी आबाची बंद पडलेली गाडी... तिच्या तेलपाण्याचे लाड झाल्यावर.. हायवेच्या अंधारात वा-याच्या सोबतीने एक विक्याच्या आणि एक माझ्या अशा कानातल्या हेडफ़ोन वर सुरु असलेल्या किशोर रफ़ी लता गाण्यांने कोप्पल आधी लागलेली चहाची तल्लफ़ .. तेवढ्या वेळात गदग कडे दुस-या रस्त्याने जाणा-यांचे रात्र वाढत चालल्या जेवणाची सोय पाहण्याचे फ़ोन... त्यांना मिळालेली सोय.. आम्ही फ़ार पुढे निघुन आल्याने “आता उरलो दोघे” या चालीत ‘एकदाचं काय ते मुक्कामी कुंडगोल गाठु मग काय ते पाहु’ म्हणत दामटवलेली आमची पल्सर...



कोप्पल ते गदग या सुनसान कच्च्या रस्त्याने उगाच मनात आणलेली भीती रात्रीचा वाढता प्रहर ... गाडीचा आवाज वगळता स्मशान शांतता... रस्त्या चुकलो का काय? अशी शंका ... एस टी च्या टायरच्या निशाणाचा जराफ़ार आधार... वस्ती दिसु लागताच वाढलेला धीर आणि रस्त्याच्या अवस्थेने समजत होते त्या मानाने फ़ारच पुढारलेलं अत्याधुनिक कुंडगोल गाव... एस.टी स्टॅंड वर भेटलेले बापु पवार चे वयाने जेष्ठ मित्र... आजची मुक्कामाची सोय त्यांच्याच घरी असल्याने ... मुक्कामी स्थळी पोहोचल्याचा निरोप आणि रस्ताच्या एकुणच अवस्थेची मागुन येणा-यांना दिलेली खबर. बॅगा घरी ठेवुन जेवणाला जवळच गाठलेला ढाबा.. जेवण उरकुन पुन्हा स्टॅंडवर येऊन बाकिच्यांना रिसिव्ह करत मुक्कामाला गाठलेलं घर...

## ७ दिवस सातवा



सकाळची अंघोळ उरकुन.. चहा घेत शेजारच्या लहानग्यासोबत केलेली धम्माल.... आजच्या सातव्या दिवसातल्या एकुण ३२७ किलोमीटर कुंडगोल – कित्तुर चा किल्ला – राजहंसगड – बेळगावचा किल्ला – काकतीचा किल्ला - वल्लभगड – नरसोबाची वाडी – सरसेनापती संताजी घोरपडे समाधी – कोल्हापूर – आणि मुक्कामी गाव भामटे अशा लांबलचक पट्ट्यासाठी सकाळी ७.०० ला प्रयाण...

७४ किमीचा कुंडगोल – कित्तुर रस्ता तिथुन किल्ला तासाभरात गाठल्यावर किल्ल्याच्या दरवाजावर पार्क केलेल्या गाड्या आणि दरवाजात प्रवेश


## कित्तूर चा कोट

१८ व्या शतकातील कित्तूर च्या मल्लासर्जा राजाची राणी चेन्नम्मा आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या दडपशाही ब्रिटीशांविरुध्द  झालेल्या युध्दाचा आणि कित्तुरचा प्रमुख सेनापती संगोळी रायन्नाच्या पराक्रमाचा ऐतिहासिक साक्षीदार कित्तुर आणि कित्तुरचा किल्ला...

किल्ल्यातले कित्तुरचे राजचिन्ह... राजसभा... पाकगृह.. खलबत खाना... तलाव.... स्नानगृह... किल्ल्याभोवतीचा खंदक, तटबंदी, मुख्य दरवाजा पाहुन तिथल्या माहीती पटावर राणी चेन्नमा च्या प्राक्रमाची गाथा वाचुन त्याच्या इतिहासखुणां जपणारे म्युझियम पाहुन कित्तुर गावात केलेला चहा नाष्टा...


कित्तुर राजचिन्ह




राजसभा


कित्तुर मागे सोडत नागेनहट्टी गाव आलं तेव्हा अभिमानाने उर भरुन यावा अशा आणि गेल्या सहा दिवसात आम्ही सोडल्यास इतरांकडुन पहिल्यांदा कानावर आणि वाचनात आल्या मराठी भाषेतल्या फ़लकांनी आणि मराठीचा अभिमान बाळगणा-या शाळेतल्या लहान मुलांनी नागेनहट्टी या तिथल्या गावात केलेली विचारपुस गावातल्या मध्यावर छ. शिवरायांची अश्वारुढ भव्य मुर्ती...  नागेनहट्टी मार्गे कानात असलेल्या एका एका हेडफ़ोनवर निवृत्ती महाराज इंदुरीकरांच्या किर्तनाच्या चिमट्यां गुद्द्यासंह थेट  गाठलेला उंच डोंगरावर दिमाखात उभा राजहंस गड


नागेनहट्टीतली अश्वारुढ शिवराय मुर्ती



# राजहंसगड (येळ्ळूरचा किल्ला)

छत्रपती शिवाजी महाराजांनी गोव्याकडील पोर्तुगीज व कोकणातील जंजिऱ्याच्या हबशांच्या फौजावर नियंत्रण ठेवण्यासाठी वापरलेला बेळगाव तालुक्यातला येळ्ळूरचा किल्ला म्हणजेच “राजहंसगड”... किल्ल्याचा मुख्य दरवाजा... तटबंदी... महादेव मंदीर.... विहिर... बुरुज... पाहिल्यावर झेंड्याच्या जागेवर सोबत असलेला भगवा गारद देत फ़डकवुन..


तटबंदी




मुख्य दरवाजा

राजहंस गडाचा निरोप घेत गाठलेलं बेळगाव शहर आणि शहराच्या मध्यभागी असलेला बेळगाव किल्ला ...

# बेळगाव चा कोट (कमल बस्ती)

सद्य काळात आर्मीच्या ताब्यात असलेला... जराफ़ार तटबंदी सोडल्यास इतर काही अवशेष नसलेला...दूर्गामातेचं  मंदिर.. जैन समुदायाचे १२०४ सालातील चालुक्य शैलीतील मंदिर ... त्याच्या मुख्यमंडपात छतावर कोरलेले एक भव्य आणि देखणं "कमळ" ज्यावरुनच याला पडलेलं कमल बस्ती हे नाव...





भुईकोट दरवाजा

त्यानंतर बेळगाव शहरातुन बेळगाव ते काकती असा पल्ला पार करुन पायथ्याला गाड्या लावुन पाय-याच्या वाटांनी चढलेला मोजक्या उंचीचा “काकटी किल्ला

## काकटी किल्ला

कित्तुरची ची राणी चेन्नमाचं जन्मस्थान असलेलं काकटी गाव... आणि तिचं लहानपण आपल्या अंगा खांद्यावर खेळवणारा काकटी चा किल्ला....





किल्ल्यावर जाणा-या पाय-या...किल्ल्याचा मुख्य बुरुज... त्याच्या चारही बाजुनी घेरलेली तटबंदी... मुख्य बुरुजात उतराण्यासाठी कोरलेल्या पाय-या... निशाणबुरुज...बुरुजावरुन दिसणारं बेळगाव शहर... आणि काकटी गाव....




काकटी सोडल्यावर तासातच ४६ किलोमीटर पार करत गाठलेला कोकण मोहिमेत हातचा ठेवलेला “वल्लभगड”

## वल्लभगड




गोव्याचे पोर्तुगीज व कोकणातील जंजिऱ्याचे हबशी यांच्या फौजांवर नियंत्रण ठेवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी कोकणच्या व गोव्याच्या सरहद्दीजवळ असणाऱ्या अनेक किल्ल्यांचा खुबीने उपयोग करून घेतला त्यातला एक किल्ला “वल्लभगड”.

गडाच्या बुरुजाच्या बाजूचं मरगुबाईचे पुरातन मंदिर ..मंदिरासमोरची दिपमाळ. मुख्य प्रवेशद्वाराची कमान.. गोमुखी .दरवाजा... आत मारुतीचे प्रशस्त मंदिर... गडाच्या पूर्व तटावर सिध्देश्वराचे पुरातन मंदिर..मंदिराच्या खाली मोठी गुहा आहे....गडाच्या मध्यभागी चौकोनी आकाराची खोल विहिर..... गडाची उध्वस्त तटबंदी ... उत्तरेच्या बुरुजाचा शिवकालीन किल्ला...

वल्लभगड फ़िरुन झाल्यावर मागे संकेश्वर शहारत येऊन केलेला चहा नाष्टा आणि आजच्यापुरती जेवणाला दिलेली सुट्टी ...

पुढचा टप्पा असलेल्या तिर्थक्षेत्र नरसोबाच्या वाडीतल्या संगमावर असलेली स्वराज्याचे सरसेनापती संताजी घोरपडे समाधी साठी उपलब्ध संकेश्वर – निपाणी – कुरुंदवाड ऐवजी विक्याने जोर दिल्याने कमी अंतराचा संकेश्वर – चिकोडी - कुरुंदवाड या गाडीसकट , अंगातल्या हाडांचा आणि पाठीच्या कण्याचा खुळखुळा करणा-या रस्त्याने गाठलेली वाडी ... मधल्या रस्त्यात कारखान्याकडे अवघा संसार घेऊन मार्गस्थ उसाने भरलेल्या बैलगाड्या .. त्यांच्या पलीकडला सुर्यास्त .. कातरवेळ....


## सेनापती संताजी घोरपडे समाधी (कुरुंदवाड)

आधी संगमावर जाऊन सरसेनापती संताजी घोरपडे यांच्या समाधी वर नतमस्तक होऊन मग अनुक्रमे श्री सुब्रम्हणेश्वर महादेव , कार्तिकेय स्वामी मंदिर आणि पावन तिर्थस्थळ दत्त दिंगबर देवस्थानाचे दर्शन घेऊन मुक्कामाला आमची वाट पाहत असलेला ५० किलोमीटर कोल्हापुर मार्गे पुढे गगनबावडा रस्त्यावर १५ किलोमीटर वरल्या भामटे गावातला सरदार पाटलांचा वाडा ....



समाधीवर पुष्प अर्पण करताना शंकरबापू

तिर्थक्षेत्र नरसोबाची वाडी



तांबडा - पांढरा



कोल्हापुरी पाहुणचार म्हणुन केलेला तांबडा पांढ-यातल्या मटण भाकरीचा बेत... त्यांच्या पडवीतल्या पंगतीत मेजवानीवर यथेच्छ ताव मारुन आलेल्या सुस्तीने नकळत लागलेली आठवी झोप..







पाटलांचा निरोप



कोल्हापुरकर श्री. सरदार पाटील

## ८ दिवस आठवा

आठव्या दिवसाच्या परतीच्या ४२२ किलोमीटर या शेवटच्या टप्प्यासाठी सरदार पाटलांच्या वाड्यावर सकाळचा घेतलेला चहा पोह्यांचा पाहुणचार आणि आदरातिथ्याबद्दल कृतज्ञता व्यक्त निरोप... मुंबई प्रवासाची दखल घेत काही कृष्ण अर्जुनांची अदलाबदली ... एव्हाना अर्जुनाच्या भुमिकेत असलेल्या माझी संक्याच्या रथावर कृष्ण म्हणुन झालेली नेमणूक आधी करवीर निवासीनी आई महालक्ष्मी दर्शन

मग कोल्हापुर ओलांडुन २४ किलोमीटर पेठ वडगाव गाठुन घेतलेलं सेनापती धनाजी जाधवरावांच्या समाधीचं दर्शन... पेठ वडगाव सोडल्यावर ६७ किलोमीटर वर तळबीड सेनापती हंबीरराव मोहिते समाधीला केललं वंदन

**सेनापती धनाजी जाधवराव समाधी पेठ-वडगाव**




**सेनापती हंबीरराव मोहिते समाधी - तळबीड**



तळबीड ओलांडुन ४७ किलोमीटर वर स्वराज्याची चौथी राजधानी आणि मोहिमेचा शेवटचा किल्ला किल्ले अजिंक्यतारा साठी साता-याकडे प्रयाण....


साता-याला आधी संदिप वाडकरांच्या सातारा एस.टी स्थानका शेजारील इमारतीत असलेल्या नव्या दुकानाला दिलेली भेट त्याच्यासोबत घेतलेला चहा नाष्टा... मग वाडकरांसोबत अजिंक्यता-याकडे कूच.. अजिंक्यता-याच्या दरवाजावर भेटलेले साताराचे अजयदादा जाधवराव त्यांच्यासोबत किल्लेदर्शन ...



भावी सातारकर संदिप वाडकरांसोबत चहा

# किल्ले अजिंक्यतारा

किल्ले अजिंक्यतारा दरवाजा



१११९० मध्ये शिलाहारांनी बांधलेला... शिलाहार... बहामनी.. आदिलशाही नंतर १६७३ साली शिवरायांनी जिंकुन घेतलेला...महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने जिंकल्यावर म्हणवला गेलेला “आझमतारा” ... पुन्हा ताराराणींनी स्वराज्यात आणल्यावर जरीपटका मिरवणारा ... किल्ले राजगड, किल्ले रायगड आणि किल्ले जिंजी नंतर मराठ्यांच्या तख्ताचा.. स्वराज्याच्या राजधानीचा चौथा किल्ला “किल्ले अजिंक्यतारा”

गडाचे दोन दरवाजे... दरवाजाचे दोन्ही बुरूज......दरवाजातून आत शिरल्यावर उजवीकडे असणारं हनुमानाचं मंदिर ..ताराबाईंचा ढासाळलेला राजवाडा आहे. ...मंगळादेवीचे मंदिर ..त्या समोर मंगळाईचा बुरूज

अशी गडभ्रमंती झाल्यानंतर अजयदादांनी सुचवल्याप्रमाणे सगळ्यांनी शाहू महाराज... महाराणी येसूबाई.. महाराणी ताराबाई समाधी दर्शनासाठी माहुली संगमाकडे केलेलं प्रस्थान

**महाराणी ताराबाई समाधी**



**शाहू महाराज समाधी**



**महाराणी येसूबाई समाधी**




## माहूली संगम

संगमावरील वंदनीय समाध्यांचे दर्शन घेतल्यानंतर केलेली दख्खन दौलतीच्या भ्रमंतीची सांगता... अजय दादांच्या सातरी पाहुणचाराचं दुपारचं सुस्त भरपेट जेवण उरकून ... २५७ किलोमीटर सातारा मुंबई या परतीच्या प्रवासाला केलेली सुरुवात ...


अजयदादा जाधवरावांचा पाहुणचार

तब्बल ९ रात्र आणि ८ दिवसानंतर लागलेली घराची ओढ... सातारा – कात्रज – पुणे – तळेगाव NH4 मार्गे खोपोली पनवेल असा लांबत गेलेला कंटाळवाणा रस्ता... त्यावरुन ओलांडलेली संध्याकाळ.. ८ दिवस रात्र एकत्र असलेल्या भटक्यांचे एकेमेकांना दिलेले जड निरोप... घरी पोहोचायला झालेली रात्र...गरम पाणी अंघोळ... घासभर जेवण आणि लाडक्या गादीवर निवांत झोप... मग सोमवार सकाळ.. ऑफ़िस .. किबोर्ड... फ़ायली .. काम..काम...आणि काम...

# "पात्र" परिचय




कोणतेही सामूहिक नियोजन आणि आबासाहेब हे एक आता सूत्र बनलं आहे. जवळ-जवळ पाच-सहा वर्षे नियोजनाची धुरा सांभाळत असलेला 'आबा' या भटकंती मध्ये आपली भूमिका नेहमीप्रमाणे लीलया पेलतो. वेळो-वेळी फोन वरून भाऊंशी-अनिकेत शी संपर्कात राहणे, राहण्याची, खाण्याची सोय या मूलभूत व्यवस्थेची जबाबदारी त्याने घेतली. सुरज सकपाळ( सुज्र्या) या भटकंतीचा ' नेव्हिगेटर ' प्लॅन रेडी करणे, स्थळांची यादी करणे, मॅपिंग करणे अश्या महत्वाच्या कामांची जबाबदारी घेऊन लीलया पेलली.

तर ही आमची पहिली जोडी जी पूर्ण भटकंती मध्ये डेक्कन राईडर्स आणि साधे सुधे ट्रेकर्सचे नेतृत्व करताना ताफ्यात पहिल्या क्रमांकावर धावत होती.

आर्थिक उलाढाल, बुकिंग्स आणि आबासाहेबांना वेळोवेळी हातभार लावणारे Thunderbird चे चालक सुबोध दादा साळुंखे. फारच शांत आणि कोणत्याही कामासाठी लगेच तयारी दर्शवणारे या भटकंती मध्ये नवीन गॅजेट सह हजर होते.
यांचे पार्टनर जागतिक विक्रम करणारे जितुदादा हे तर सर्वांना माहीतच आहेत. त्यांनी या भटकंती मध्ये आपलाच रेकॉर्ड मोडत तब्बल ५१९४ फोटो काढलेले आहेत आणि त्यात फक्त८६ फोटो मुख्य कॅमेऱ्याचे आहेत. बाकी सगळा सेल्फी.




तर अशी ही दुसऱ्या क्रमांकाची जोडी आबासाहेबांच्या मागोमाग या भटकंती मध्ये सहभागी होती.





अखंड भटकंती मधील जान आणि फक्त मनोरंजन, मनोरंजन आणि मनोरंजन म्हणजे संक्या. ग्रुप मधील आळस काढून टाकायचं काम सर्वस्वी त्याच्या मजबूत खांद्यावर होत. आणि त्याची साथ दिली ती स्वयंभू विलास दादांनी.
मध्येच कुठंतरी गायब होऊन दत्ता सारखे प्रकट होणारे आणि विलास दादा आपल्या शैक्षणिक क्षेत्र असलेल्या कोल्हापूर-बेळगाव सीमेवर नवीन नवीन रस्ते शोधणे आणि ठिकाण शोधणे आणि आबा साहेबांच्या जबाबदारी मध्ये हातभार लावणारे होते.

तर ही अशी तिसऱ्या क्रमांकावर होंडा शाईन घेऊन न थांबता Hide and Seek वाली जोडी होती.

पूर्ण भटकंती मध्ये Entertainment आणि ' आवश्यक ' ठिकाणांचे व्यवस्थापन गुंड भाऊंकडे होत. विशेष म्हणजे दुपारच्या जेवणाची व्यवस्था, पाणी, यांची व्यवस्था हिरहिरने पेलली.
यांना वाहून नेणारा किरण माळी म्हणजे फोन चा मेगा पॅक. बाकी सगळ्यांचा फोन रोमिंग मध्ये घाबरत होता अणि याचा फोन काही खाली बसत नव्हता. एकटाच गायब होऊन संपूर्ण ठिकाण पालथं घालणारा मोनी बाबा. सेल्फी फोटों मध्ये दुसऱ्या क्रमांकावरची जोडी.

अशी ही जोडी ४ थ्या क्रमांकावर मागे-पुढे, डावी-उजवी कडे, खाली-वर अश्या सगळ्या ठिकाणी होती.




ठरलेल्या भटकंतीचे कव्हरिंग आणि मीडिया चा भार सुधीर दादा मल्टीमीडिया प्रा. ली. कडे होता. एक-दोन कॅमेरे, दोन-चार लेन्स, नवा हिरो चा गो प्रो, Online गॅजेट्स आणि भली मोठी बुलेट घेऊन मुक्काम ठरला कि सुसाट बंगळूर-चेन्नई एक्सप्रेस असा त्यांचा आवाका होता.
यांचा अर्जुन खुद्द कलेक्टर मागे अंबारीत बसल्यामुळे यांचा रथ मागे-पुढे न बघता चालत होता. गाडी थांबली कि नारळ-पाणी, ज्यूस, आईस्क्रीम, संध्याकाळ चे नाष्टा, त्या त्या ठिकाण ची स्पेशालिटी साठी नेहमी पुढाकार घेतलेले आमच्या भटकंती चे कलेक्टर आणि परराष्ट्र मंत्री उर्जित दादा.
तर यांची रायगड पासिंग बुलेट लाईन मध्ये अधी-मध्ये लुडबुड करत ५ वर होती.




या दोघांची ख्याती तर सर्वश्रुत आहे. अडगळीचे रस्ते शोधणे, वेळोवेळी सूचना देणे, वाहनांबद्दल सूचना आणि इतरांना प्रेरणा देणे याशिवाय अजून महत्वाची काम मोठ्या बापूंच्या अनुभवी खांद्यांवर होती.

पण आमचा बारका बापू यावेळी नेहमीच्या फॉर्म मध्ये नव्हता. बुंदीच्या नादात बछडं उधळत होतं. सगळी कामं फोन वर.

तर अश्या प्रकारची रेड कलर जोडी मध्येच गायब होऊन सगळ्यात पुढे असायची.

विक्रांत गायकवाड



आता आमच्याबद्दल काय लिहावं ? आमच्या सारखे आम्हीच... साधारण तीन चारदा "खरं बे सच्या स्पीडब्रेकर दिसला नाय" वगळल्यास आमचे कृष्ण विक्रांतभाऊ गायकवाडांसारखा सहचर लाभणे म्हणजे भाग्यच... बाकी प्लॅन मध्ये नसतील त्या ठिकाणांची कुरघोडी, व्यवस्थापकांच्या कामात जमेल तशी मदत आणि मीडिया चा सरकारमान्य भार दोघांनी खांद्यावर पेलता येईल तेवढा पेलला...




तर ही आमची सुपर कॉम्बिनेशन जोडी सगळ्यात शेवटी पण होती आणि सगळ्यात पुढे सुद्धा.

या सफरीची युट्युब व्हिडियो लिंक https://youtu.be/RPDBG8Dqnm0

स्वराज्याचे दख्खन तख्त ठरलेल्या... दक्षिण भारतातील मराठ्यांच्या अभिमानी “दख्खन दौलती”च्या तब्बल २१०० किलोमीटरच्या चेन्नई ते मुंबई प्रवासाची...१८ किल्ल्यांना मानवंदना देत... इतिहासाचं वादळी वेड उरात घेऊन... धुरळा उडवत.. विनाअट्टहास .. उत्कृष्ट नियोजनाने, सुसंगता, एकत्रितता, समजूतदारपणाने ..सुखरूप.... सांगता

साधे सुधे ट्रेकर्स मधल्या भटक्यांना अशाच ज्ञात-अज्ञात नव्या वाटा खुणावत आहेत... पुढच्या मोहिमेची वार्ता येईतो.. मुक्काम आणि निरोप .... जय शिवराय....!!

संदर्भ आणि ऋणनिर्देश :

प्रवासापूर्वीचे नकाशे, गड्किल्ल्यांची माहीती, तिथे पोहोचून अनुभवलेले इतिहास संदर्भ, आधीच नोंद करून ठेवल्याने कमी वेळात पाहता आलेले भूगोलाचे ठावठिकाणे... विकिपिडिया, गुगल map वेबसाईटस वरून घेण्यात आले.. कोणत्याही कार्याच्या मुखपडद्यावर मोजके चेहरे दिसले तरी त्यांच्या पाठीशी आणि कार्य सिद्धीस नेण्यास अनेक हस्तींचा मोलाचा वाटा असतो. या दक्षिण स्वराज्याच्या भटकंती मध्ये आम्हा भटक्यांच्या मागे अश्याच काही लोकांचे भक्कम पाठबळ लाभले.

सुरवातीलाच संपूर्ण भटकंती मार्ग, दक्षिणेतील किल्ले आणि किल्ल्यांवरील महत्वाची ठिकाण याबाबत माहिती अमर साळुंखे आणि अनिकेत वाघ यांनी पुरवली. बेंगळुरू स्थिती मराठी व्यवसायिक आणि आमच्या आबासाहेबांचे नातेवाईक केशव कापसे, विजय कापसे, अशोक कापसे यांनी दोन दिवस राहण्यासाठी उत्तम जागा आणि उपहाराची सोय केली या शिवाय सिरा ला राहण्याची सोय केली. पुढे हुबळी ला रात्री उशिरा पोहोचल्याने आमच्यासाठी रात्रभर जागून बापू पवार यांचे मित्र वीरेन गौडा कोटुर यांनी त्यांच्या राहत्या घरात राहण्याची आणि सकाळी अल्पोपहाराची सोय केली. कोल्हापूर मध्ये आल्यावर घरचा आहेर म्हणून आमचे मित्र सरदार दादा पाटील यांनी कोल्हापूर स्पेशल तांबडा-पांढरा, भाकरी-मटण असा बेत करून सगळ्या भटकंतीचा थकवा घालवला. सर्वात शेवटी सातारा येथे भटकंती चा शेवट करताना आमचे पाठीराखे आणि आधारस्तंभ संदीपदादा वाडकर यांनी चहापान करवून साताऱ्यात स्वागत केले आणि परतीच्या प्रवासात अजयदादा जाधवराव यांनी फक्कड बाजरीच्या भाकरीचा बेत करून प्रवासाची सांगता केली.

या सर्वांच्या आशीर्वादाने आम्ही हा लांबीचा पल्ला सुखरूप पार पाडला. या प्रवासात आम्हास प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या मदत करणाऱ्या सर्वांचे आभारी आहोत. शेवटी तुमच्याशिवाय एवढा प्रपंच करणे कठीणच.... त्याबद्दल ऋणी आहोत...!!



मित्रहो!

गेल्या होळीला ज्या टीमने बाईकवर स्वार होऊन कोकणातील दुर्गवैभवाचा मागोवा घेतला तेच मराठे वीर यावेळी समस्त दक्षीणविजयाला दौडले. चेन्नई ते मुंबई अशी बाईकवरची दुर्गसफ़र असे वेडेच करू जाणोत. मराठमोळी सुसाट दुर्गसफ़र म्हणजे चारधाम यात्राच. हे काही साईट्सिईंग नव्हे. हा मराठमोळ्या भक्तीचा दुसरा पैलू. पहिला पैलू म्हणजे टाळ मृदंगांच्या साथीने होणारी आषाढी कार्तिकी. ती भक्ती जेवढी अस्सल तेवढीच ही! आळंदी, देहू, पंढरपूर भक्ती आणि शांती देतात. तर काळ्या कातळातले हे गडकिल्ले शक्ती आणि स्फ़ुर्ती देतात. मराठी संस्कृतीचा हा पैलू दाखवणारं हे पुस्तक कसं वाटलं ते सांगा. कृपया आपली प्रतिक्रिया सचिन काकडे (9594566676) किंवा आबासाहेब कापसे (9870140114) यांना कळवा.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या दुर्गसाहित्यिकांमध्ये नचिकेत जोशी, माधुरी नाईक, सचिन काकडे, विशाल दळवी, पंकज घारे, संकल्प चौधरी, भास्कर नारकर, विठ्ठल गोरे असे एकाहून एक सरस लेखक आहेत. किल्ल्यांच्या पायऱ्या सुद्धा यांच्या पावलांची चाहूल ओळखतात इतके यांचे घनिष्त संबंध झालेत. या दुर्गवेड्यांशी संपर्कात रहाण्यासाठी ई साहित्य चे VIP मेंबर व्हा. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षर लोकांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवा. म्हणजे आम्ही तुम्हाला VIP मेंबर करतो. आणि त्यांनाही पुस्तकं पाठवतो.

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाही. तुमच्या मोबाईलवर आता हजार मराठी ई पुस्तके आहेत. मराठी ई पुस्तकं तुम्ही www.esahity.com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com.esahity.www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा. हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आमचा पत्ता : esahity@gmail.com

आपले मित्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान